Special Issue 135 (B) - आधुनिक हिंदी साहित्य : विविध विमर्श
UGC Approved Journal

ISSN : 2348-7143
February-2019

# हिमांशु जोशी के उपन्यासों में व्यक्त नारी जीवन

डॉ. रविंद्र खरे
हिंदी विभागाध्यक्ष
कला, वाणिज्य एवं कम्प्युटर ॲप्लीकेशन
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरा,
ता. यावल, जि. जलगाँव

आधुनिक युग में सबसे अधिक शोषित नारी है। घर-परिवार में नारी की अवस्था दयनीय होती जा रही थी। वह घर एवं बाहर दोनों ही स्थितियों में विवश जीवन व्यतीत कर रही है। सम्प्रति नारी एक साथ गृहिणी, पत्नी, माँ का कर्तव्य निभाती हुई, नौकरी भी कर रही है। कई जिम्मेदारियाँ संभालती हुई, तथा रोजमर्रा के जीवन में आनेवाली हर छोटी-बड़ी समस्या से जूझ रही है। ऐसे समय में नारी के अस्तित्व पर प्रश्नचिह्न लगा हुआ है। पुरूष प्रधान संस्कृति में समर्पण का मिथक बनी हुई है। नारी पुरूषों के अधिकार में अपना जीवन-सर्वस्व समर्पित करने के संदर्भ में डॉ. सूर्यनारायण रणसुभे के विचार उचित लगते है, ``वह पुरूषों द्वारा स्थापित मूल्यों को ही शाश्वत तथा महान समझने लगी और उन मूल्यों के अनुसार जीने में ही अपने जीवन की कृतार्थता समझने लगी। यही से वह खुद से दूर होने लगती है। धीरे-धीरे यह मानसिकता इतनी दृढ़ होने लगती है कि वह गुलाम है, यह गुलामी मानसिक, बौध्दिक तथा शारीरिक तीनों स्तर पर हैं, इसे स्वीकारने को भी वह तैयार नहीं होती। उल्टे पुरुष समाज द्वारा निर्मित इन मूल्यों की शाश्वतता का वह समर्थन करने लगती है।``[1]

नारी के जीवन में आज भी घर-परिवार, रिश्ते-नाते, रीति-रिवाज केन्द्र में है। परंपरागत मानसिकता में जकड़ा हुआ पुरूष का स्त्री के प्रति अपना दृष्टिकोण यही है कि वह घर में दासी और पति को शैय्या सुख प्रदान करनेवाली है। नारी की यंत्रवत जीवन जीने की प्रक्रिया लगातार जारी है। नारी की स्थिति एवं गति के संदर्भ क्षमा शर्मा लिखती हैं कि, ``विश्व स्तर पर यह माना गया है कि यदि महिलाओं की स्थिति सुधारनी है, उनके प्रति भेदभाव कम करना है तो उनकी आर्थिक स्थिति सुधारनी होगी। स्त्रियों को यह समझ में आ गया है कि जब तक उनकी आर्थिक स्थिति नहीं सुधरती तब तक उनका विकास नहीं हो सकता क्योंकि दुनिया के अट्ठावन प्रतिशत संसाधनों पर पुरूषों का कब्जा है।``[2] नारी को अपनी आर्थिक स्थिति को प्रबल बनाना होगा। हिमांशु जोशी ने अपने उपन्यासों में नारी जीवन का पूर्णरूपेण चित्रण किया है।

`अरण्य` उपन्यास में नारी की समस्याओं का सूक्ष्मता से चित्रण किया गया है। उपन्यास की नायिका कावेरी की व्यथा यही है कि उसका विवाह ऐसे ठेकेदार से तय किया जाता है। जो पहले से ही दो विवाह कर चूका है, जो अब बुढ़ा हो चूका है। कावेरी अनाथ है, माधव मामा के यहाँ उसका पालन-पोषण होता है। मामा के परिवार की आर्थिक स्थिति दयनीय होने से, कावेरी अपने विवाह का बोझ उन पर डालना नहीं चाहती है। समाज की दृष्टि से एक ओर बढ़ती उम्र तथा आर्थिक विपन्नता के कारण कावेरी विवश हो जाती है। कावेरी स्वयं को समर्पित करते हुए कहती है, ``बोज्यू अपने से यदि किसी का भला हो जाय तो बुरा क्या? मेरी अब कोई चाह नहीं। अगर इत्ते परानियों को मैं तनिक भी सुख पहुँचा सकी तो इससे बड़ी बात मेरे लिए और क्या होगी ! मामा के कलेजे का कांटा भी उतर जाएगा। कावेरी कहते-कहते रूक आयी! कुछ सोचती हुई फिर आगे बोली, फिर लोक-लाज का भी तो सवाल हैं न! वैसे ही लोग बुरा-भला कहते हैं। बिना बात गाल बजाते हैं।``[3] इससे स्पष्ट होता है कि कावेरी जैसी स्त्रियाँ समझदारी से समस्या का सामना कर सकती है। अपने मामा की आर्थिक स्थिति के कारण विवश होकर वह प्रौढ़ से विवाह करने के लिए तैयार है। उसकी आंयु कम है और अधेड़ ठेकेदार के साथ अपना जीवन काटने पर मजबूर है। तथा अपनी सौतों के साथ मेलजोल बनाकर पति का दुःख अपना समझकर सहनशीलता दिखाती है।



Dongar Kathora

SBD 18-19

IMPACT FACTOR : 5.2331(UIF) REVIEW OF RESEARCH UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# भारतातील दारिद्र्य आणि आर्थिक वृध्दी एक दृष्टीक्षेप

राजरत्न भिमराव पोहेकर[1] , डॉ.सुरेश बी. ढाके[2]
[1]संशोधक विद्यार्थी , उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.
[2]विभाग प्रमुख अर्थशास्त्र , कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, महिला महाविद्यालय,डोंगर कठोरे, ता यावल जि जळगांव.

**गोशवारा:**

प्रस्तूत शोध निबंधामध्ये भारतातील दारिद्र्य व आर्थिक वृध्दी या दोन मुद्यांना येऊन दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून 70 वर्षे पूर्ण होत आहेत तरी भारत दारिद्र्य मुक्त झाला नाही. एकी कडे भारताचा आर्थिक वृध्दी दर वाढत आहे. आपण तो दोन अंकी होण्याची अपेक्षा करत आहेत येणाऱ्या काळात तो दोन अंकी होईल परंतू भारतातील दारिद्र्य, कुपोषण बेरोजगारी या समस्या संपत नाहीत. याचे कारण काय याचा शोध घेण्याचा प्रस्तूत शोध निबंधात प्रयत्न करण्यात आला आहे.



**प्रस्तावना:**

भारतीय लोकसंख्येचा विचार केल्यास 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 121 कोटी आहे. सी रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली मे 2012 मध्ये सी. रंगराजन पॅनल स्थापन करण्यात आले. त्यामध्ये महेद्र देव, के सुंदरम, महेश व्यास आणि के दत्ता या अर्थतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला. या पॅनल ने दारिद्र्यरेषा ठरविणाऱ्या सुरेश तेंडूलकर गटावर प्रचंड टिका करण्यात आली म्हणून दारिद्र्यची नविन रेषा ठरविण्यासाठी स्थापन करण्यात आली. या पॅनलने 2011– 12 साठी दारिद्र्य रेषा ठरविली. देशामध्ये 29.6 टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली असल्याचे सांगितले 121 कोटी पैकी 29.6 टक्के म्हणजे देशातील 35 कोटी 56 लाख लोक दारिद्र्य रेषेखाली जीवण जगत आहेत. या पेक्षा भयानक स्थिती म्हणजेच अर्जून सेन गुप्ता यांनी दिलेला अहवाल होय. अर्जून सेन गुप्ता यांच्या अहवालानुसार देशातील 83 कोटी लोकांनकडे 6 ते 20 रूपया पर्यंत दरडोई उत्पन्न आहे म्हणजेच ऐवढे लोक दारिद्र्याचे जीवन जगत आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत देशात अन्नधान्य, बेरोजगारी आणि गरिबी म्हणजेच दारिद्र्य हे भीषण प्रश्न बनले आहे त्यामूळे 1971 ला तत्कालीन प्रधानमंत्री इंदीरा गांधी यांनी संसदीय निवडणूकी वेळी गरीबी हटाव ही घोषणा चौथ्या पंचवार्षिक योजनेत केली. याचा परिणाम असा झाला की, नियोजन मंडळाने दारिद्र्य निर्मूलन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. भारत सरकारने रोजगार निर्मिती दारिद्र्य निर्मूलनाचे सर्वात महत्वाचे साधन असल्याने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दारिद्र्य निर्मूलन रोजगार निर्मितीसाठी विविधांगी प्रयत्न केले आहे. त्यामध्ये 1973–74 ला आवर्षण प्रवण क्षेत्र कार्यकम, 1975ला 20 कलमी कार्यकम, 1980 एकात्मीक ग्रामीण विकास कार्यकम, 1989 ला जवाहर रोजगार योजना, 1999 ला जवाहर ग्राम समृध्दी योजना, 1985–86 ला इंदिरा आवास योजना, 1997 ला स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, 1999 ला स्वर्ण जयंती स्वरोजगार योजना, 2005 ला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना त्याच प्रमाणे 2009 ला राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान व आता अन्न सुरक्षा कायदा इत्यादी. यामध्ये आणखी काही योजना व कार्यक्रम सांगता येतील परंतु सरकारचे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम इत्यादी दिलेल्या योजनांनी लक्षात येईल. प्रश्न असा पडतो की, एवढे सारे शासनाने प्रयत्न करून भारत दारिद्र्य मुक्त का झाला नाही. याचा ऊहापोह आपणाला करावा लागेल.



College of Arts Com... Dongar Kathore

V2m 18-19 ①



६) जून तंत्रज्ञान :-

अनेक शेतकरी पारंपारीक पध्दतीने शेती करतात त्याचा शेती उत्पादनावर परीणाम होतो शेतीची उत्पादकता कमी राहते.

७) दळणवळण साधनाची कमतरता :-

शेतकऱ्याला दळणवळणाच्या साधनाची कमतरता असल्यामुळे स्थानीक बाजारात शेतमालाची विक्री करावी लागते अतिशय कमी दराने शेतमालाची खरेदी व्यापारी करतात त्यामुळे नफा न होता तोटाच होतो.

८) शेती विषयक संशोधनाचा अभाव :-

भारतात कृषी महाविद्यालयाचे कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन संस्था इत्यादीकडुन शेतीविषयक संशोधन केले जाते पण हे संशोधन प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यापर्यंत कधी पोहचत नाही व जरी पोहचले तरी शेतकरी त्याचा स्वीकार करत नाहीत.

९) व्यापारी दृष्टीकोनाचा अभाव :-

भारतातील अनेक शेतकरी शेती केवळ उपजीविकेचे साधन असे मानतात शेती करुन चांगले उत्पन्न मिळविता येते ही दृष्टीकोन शेतकऱ्यामध्ये रुजला पाहीजे अशी स्थिती दिसत नाही.

१०) बाजार पेठेच्या अपुऱ्या सोयी :-

संघटीत बाजारपेठेच्या अभावामुळे शेतकरी मोठया बाजारपेठेत शेतमालाची विक्री करु शकत नाही यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान मोठया प्रमाणात होते.

संदर्भ ग्रंथ :-
१) कृषी समस्या-मनोहर चन्द्र पाण्डे
२) कृषी अर्थशास्त्र-डॉ.एस.बी.कट मुसरे
३) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था-प्रा.सौ.जाधव राजेश्री
४) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था-डॉ.बी.डी.इंगळे
५) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था-डॉ.आर .एस.सोळुंके
६) भारतीय अर्थव्यवस्था-डॉ.वसुधा पुरोहित
७) भारतीय अर्थव्यवस्था-प्रा.रायखेलकर
८) कृषी विकासाचे अर्थशास्त्र-डॉ.पांचळे ,डॉ.टपले,डॉ.खंदारे
९) समाजशास्त्र-डॉ.भ.कि.खडसे
१०) समाजकार्य प्रोज-डॉ.निलम तारके

□□□

25

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा

प्रा.डॉ.विनोद झामा मोरे
सहाय्यक प्राध्यापक- अर्थशास्त्र विभाग
कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन महिला महाविद्यालय,
डोंगरकठोरे, ता.यावल जि.जळगाव

***********

**प्रस्तावना-**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वज्ञात आहेतच. त्याच प्रमाणे एक प्रकांड पंडित, एक असामान्य प्रतिभावंत, नामवंत शिक्षणतज्ञ, महान समाजसुधारक आणि दीन दलितांचे कैवारी म्हणून देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा जनमानसामध्ये रुजली आहे. त्यांच्या बहुरंगी आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष पैलू सर्व साधारण जनतेला अपरिचित आहे. तो म्हणजे एक अर्थतज्ञ म्हणून त्यांची कामगिरी आहे.

**जीवन परिचय-**

डॉ.भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. त्यांचे वडील रामजी आंबेडकर हे सैन्यात सुभेदार होते. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण दापोली येथे झाले. त्यानंतर त्यांचे शिक्षण सातारा व मुंबई येथे झाले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी.ए. ची पदवी १९१३ मध्ये प्राप्त केली. बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. 'प्राचीन भारतातील व्यापार' या विषयावर कोलंबिया विद्यापीठात त्यांनी शोधप्रबंध सादर केला.

भारतात परतल्यानंतर १९१८ ते १९२० या दोन वर्षांच्या कालावधीत मुंबई येथील प्रसिध्द सिडनेहॅम महाविद्यालयात त्यांनी अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. बाबासाहेबांनी उच्च शिक्षणाचा ध्यास घेतलेला होता. त्यामुळे १९२० मध्ये त्यांनी इंग्लंड मध्ये शिक्षणासाठी जाण्याचा निर्णय घेतला. तेथे लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स या अर्थशास्त्राच्या अध्यापन व संशोधन करणाऱ्या जग



Dongar Kathora

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 183 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

V2M-18-19
18-19

# डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे शेती विषयक विचार

प्रा. डॉ. विनोद झागा मोरे
सहाय्यक प्राध्यापक -अर्थशास्त्र विभाग
कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन
महिला महाविद्यालय डोंगरकठोरे,
ता.यावल.जि.जळगांव
मो.नंबर-७७०९४१८३८०
Email-vzmore39@gmail.com

**प्रास्तावीक -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वज्ञात आहेतच. त्याच प्रमाणे एक प्रकांड पंडित,नामवंत शिक्षणतज्ञ, महान सुधारक आणि दीन दलितांचे कैवारी म्हणून देखील डॉ. आंबेडकरांची प्रतिमा जनमानसामध्ये रुजली आहे. त्यांच्या बहुरंगी आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्वाचा एक विशेष पैलु सर्वसाधारण जनतेला अपरिचित आहे. तो म्हणजे एक अर्थतज्ञ म्हणून त्यांची कामगिरी त्यांचा शेतीविषयक विचारांचा परामर्श घेणे व सद्य काळात शेती व्यवस्थेसमोर जी आव्हाने उभी आहेत. ती आव्हाने पेलण्याचे सामार्थ्य डॉ. बाबासाहेबांच्या शेती विषयक विचारात आहेत. का त्यावर प्रकाश टाकणे हाच या लेखाचा उद्देश आहे.

**जीवन परिचय -**

डॉ.भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील महू या गावी एक गरीब कुटूंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोली येथे झाले. त्यानंतर त्यांचे शिक्षण सातारा व मुंबई येथे झाले. मुंबई एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी १९१३ मध्ये प्राप्त केली. उर्वरित शिक्षण श्रीमंत सयाजीराव गायकवाड व छत्रपती शाहू महाराज यांनी देवू केलेल्या शिष्यवृत्तीवर त्यांनी पूर्ण केले. त्यानंतर सिडनहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली. बाबासाहेबांनी उच्च शिक्षणाचा ध्यास घेतलेला होता. त्यामुळे १९२० मध्ये त्यांनी इंग्लड मध्ये शिक्षणासाठी जाण्याचा निर्णय घेतला. इंग्लड मधील ब्रिटीश म्युझियम ग्रंथालयात बसून आंबडेकरांनी अगणित ग्रंथाचे वाचन केले. ब्रिटनमध्ये बाबासाहेबांनी कायदयाचा अभ्यास केला. ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यानंतर त्यांनी मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्य केले. पुढे याच महाविद्यालयाचे प्राचार्य झाले.बाबासाहेबांनी काही नियतकालिके चालावून समाजप्रबोधन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. `प्रबुध्द भारत` `बहिष्कृत भारत` `मुक नायक` ही त्यांची शीर्षक अर्थपूर्ण होती. या नियतकालिकांमधील अग्रलेख त्या काळात बहुचर्चित असत. आपले सर्व आयुष्य दीन दलितांच्या उध्दारासाठी घालवले . इंग्लड ,अमेरिका सारख्या देशात मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी भारतीय समाजासाठी शेवटपर्यंत केला. बहूजन सुखाय, बहूजन हिताय हे तत्व त्यांच्या प्रत्येक विचाराचा गाभा राहिलेला होता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे शेतीविषयक विचार -**

भारताला १९४७ साली राजकीयदृष्टया स्वातंत्र्य मिळाले. पण भारतीय जनता आर्थिक , सामाजिक दृष्टया मागासलेली होती. गरीबी प्रचंड आर्थिक ,सामाजिक विषमतेत भारत विभागला होता.शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा पण शेती मागासलेली होती. शेतकरी ,शेतमजूर यांना दारिद्रयाने जखडले गेले होते. दीन दलितांच्या व्यथा त्यांनी जवळून पहिल्या होत्या. त्यांच्यतील माणूसपणा जिवंत करुन त्यांच्या आर्थिक, सामाजिक विकासाचा मार्ग त्यांनी दार्खविला . म्हणूनच त्यांना दलितांचे कैवारी म्हणतात. डॉ. बाबासाहेबांनी फक्त दलितांसाठी कार्य केले नाही तर त्यांनी



Dongar Kathore

AKS 18-19

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 134 : Environment and Sustainable Development (ESD 2018) UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# पर्यावरण संरक्षण - जनजागृतीची गरज

आशालता के.आवटे
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता.यावल, जि.जळगांव.

पर्यावरण व मानवाचा घनिष्ट संबंध आहे. पर्यावरणाचा मानवावर व मानवाचा पर्यावरणावर सतत परिणाम होतो. इतकेच नव्हे तर मानवाच्या क्रियांचा पर्यावरणावर जो अनिष्ट परिणाम होतो तो उलटून परत मानवालाच भोगावा लागतो. हे सुध्दा मानवाच्या निदर्शनास आले. त्यामुळे मानवाने फार जपून परिणामांचा विचार करुन वागले पाहिजे.नाहीतर मानवाच्या पुढील पिढ्या बरबाद होतील हा नवीन विचार उदयास आला आहे. संपूर्ण जगात पर्यावरणाविषयी व त्याच्या सुधारणाविषयी अभ्यास व चर्चा गंभीरपणे होत आहे. प्रत्येकाचाच पर्यावरणाशी संबंध येत असल्याने प्रत्येकानेच त्याविषयी जागरुकता बाळगणे ही अता काळाची गरज आहे. मानव समाज करुन राहतो. त्यामुळे मानवाच्या पर्यावरणासंबंधी समस्या एकट्या-दुकट्याच्या नसून सामाजिक समस्या होतात व त्या संपूर्ण समाजाला व जागतिक स्तरावर मानवजातीलाच ग्रासून टाकतात. म्हणून पर्यावरणाच्या समस्या दुर्लक्षित करुन चालण्यासारखे नाही यात सरकडी म्हणजे पर्यावरणाच्या बहुतेक समस्या मानवाने निर्माण केलेल्या आहेत. म्हणून त्यावरील उपायही मानवाने शोधायचाचे व मुख्य म्हणजे आचरणात आणावयाचे आहे यासाठी जन-जागृतीची गरज आहे.

पर्यावरण सगळ्यांचेच आहे व ते राखणे सगळ्यांचेच कर्तव्य आहे ही जाणीव सामान्य लोकात जागृत झाली तर पर्यावरण रक्षणाचे काम सोपे होऊन जाईल. कारण पर्यावरणविषयक जागृती हा पर्यावरण सुधारणेचा पाया आहे. राष्ट्रीय पातळीवर सरकार पर्यावरणविषयक धोरणे ठरविते. कायदे तयार करते व त्यांची अंमलबजावणी करते. सामाजिक पातळीवर पर्यावरणप्रेमी संस्था पर्यावरण वाचविण्याचे निरनिराळे कार्यक्रम करीत असतात. अशा माध्यमातून नागरिकांचे कूलिगट तयार करुन पर्यावरणविरोधी प्रकल्पाविरुध्द आंदोलन छेडता येते. उदा. जीवविविधतेने समृध्द केरळमधील सायलेंट व्हॅली या ठिकाणी जलविद्युतकेंद्र निर्मितीचा प्रस्ताव जनआंदोलनाने हाणून पाडला व त्याऐवजी तो प्रदेश अभयारण्य म्हणून घोषित झाला. पर्यावरण रक्षण हे एकट्या दुकट्याचे काम नाही असेही म्हणावयास नको. अगदी वैयक्तिक पातळीवरही प्रत्येकाला लहानसहान बाबीतूनही पर्यावरणाची काळजी घेता येते व इतरांना त्याचे धडे घालून देता येतात. उदा. झाडे लावणे व त्यांची निगा राखणे, प्लॅस्टिकचा वापर कमीत कमी करुन त्याचा कचरा न होऊ देणे, आपल्या वाहनांची व्यवस्थित देखभाल करुन त्याद्वारे होणारे वायुप्रदूषण आटोक्यात ठेवणे, निरनिराळ्या पर्यावरण कार्यक्रमात सक्रिय भाग घेणे वगैरे. मुख्य म्हणजे पर्यावरण संरक्षण ही एक राष्ट्रव्यापी चळवळ व्हावयास हवी.

परंतु ही राष्ट्रव्यापी चळवळ होण्यासाठी अजून काही बरेच काही करावयाचे आहे. विशेषत: पर्यावरण विषयक जनजागृती पुरेशी नाही. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास सुरुच आहे. जनजागृती हाच या ऱ्हासाविरुध्द प्रभावी उपाय आहे. जनजागृतीसाठी टेलिव्हिजन, रेडिओ, वर्तमानपत्रे, इतर साहित्य इ. माध्यमातून प्रचार करता येतो. जीवविविधतेचा नाश, वनांचा ऱ्हास, लोकसंख्यावाढ, प्रदुषण इ. पर्यावरणविषयक समस्यांची माहिती व त्यांच्या नियंत्रणाचे उपाय प्रसारमाध्यमातून प्रभावीपणे मांडता येतात. विशेषत: तरुणपिढी व लहान मुलांना पर्यावरणाची माहिती पुरविलीच पाहिजे. त्यासाठी त्यांच्या अभ्यासक्रमात अगदी महाविद्यालयीन स्तरावरही पर्यावरणशास्त्राचा अभ्यास नेमून दिला आहे. अभ्यासाशिवाय गटचर्चा, वृत्तसत्रे, परिसंवाद, प्रदर्शन, पथनाट्ये इ. विविध उपक्रमातून पर्यावरणाचा विषय सतत त्यांच्या डोळ्यांसमोर राहिला पाहिजे व त्यांची जाणीव तयार होत गेली पाहिजे. कारण हे पर्यावरण आता या



Women's College of Arts, Com. & Computer ... Dongar Kathore

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 109 : Role of Social Reformers in Nation Building | February 2019

# स्त्री शिक्षण – समाजसुधारक महर्षी कर्वे

– प्रा.डॉ. आशालता के.जावळे
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर अप्लिकेशन महिला महाविद्यालय,
डोंगर कठोरे, ता.यावल, जि.जळगांव.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांना १०४ पूर्ण वर्षांचे आयुष्य लाभले. आणखी पाच महिने ते जगते तर ते १०५ वर्षांचे झाले असते. एवढे दिर्घ आयुष्य आणि तेही क्रियाशील स्वरुपाचे आयुष्य लाभणे हा भाग्ययोगच म्हणावयास हवा. हे भाग्य जसे कर्वे यांच्या वाट्याला आले त्याचप्रमाणे कर्वे महाराष्ट्रात जन्माला आले आणि त्यांचे कार्यही येथेच घडले हे महाराष्ट्राचे भाग्य होय.

शंभर वर्षाचा रोमहर्षक कालखंड कर्वे यांना अनुभवता आला. ते जन्माला आले तेव्हा १८५७ मधील स्वातंत्र्ययुध्द होऊन, ब्रेमरोम वर्ष होत आले होते. त्यांच्या जन्माला सहा महिने उलटून गेल्यानंतर राणीचा जाहीरनामा प्रसिध्द झाला. राणीच्या जाहीरनाम्यानंतर या देशातील धार्मिक आचार–विचारांत अकारण ढवळाढवळ न करण्याचा व समाजाचा व्यर्थ रोष ओढवून न घेण्याचा पवित्रा घेतला गेला. येथे पक्के पाय रोवल्यानंतर स्वत:चे शिक्षणविषयक धोरण अमलात आणायला इंग्रजांनी सुरुवात केली होती. वुडचा खलिता, मेकॉलेचे शिक्षणविषयक धोरण आणि माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनचे दूरदर्शी वर्तन या सर्वांचा परिणाम घडून महाराष्ट्रात शिक्षणाची नवी पहाडी सुरु झाली होती. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली आणि पदवीधरांची पहिली तुकडी बाहेर पडावयाची होती. मिल, स्पेन्सर, रुसो, लॉक इत्यादिकांच्या तत्वविचारांचा परिचय होऊ लागल्यामुळे वैचारिक कलहाला सुरुवात झाली होती. समाजातील सर्वात उपेक्षित अशा स्त्रीवर्गाची दु:स्थिती हा चर्चेचा विषय होऊ लागली होती. सुशिक्षित तरुण वर्गात समाजसुधारणेचे विचार मुळ धरु लागले होते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख आणि महात्मा ज्योतीराव फुले यांच्या क्रांतिकारक विचारप्रतिपादनामुळे समाजात विचारमंथन सुरु झाले होते. इंग्रजी राज्य, त्याचा कारभार व त्याबरोबर आलेले विभिन्न विचार यांच्या अनुषंगाने महाराष्ट्रात मुख्यत्वे दोन प्रकारच्या प्रतिक्रिया उत्पन्न झाल्या. एक प्रतिक्रिया राजकीय स्वातंत्र्याची मागणी करणारी होती तर दुसरी प्रतिक्रिया येथील समाजात अग्रक्रमाने सामाजिक सुधारणा घडवून आणाव्यात अशा प्रकारची होती. दुसऱ्या प्रतिक्रियेची दिशा संस्थात्मक उभारणीची व सुधारकी विचारांच्या प्रचाराची होती.

सुधारणावाद्यांचा आग्रह आधी सामाजिक सुधारणा केल्या पाहिजेत, असा होता आणि सुधारणांसाठी त्यांना शिक्षणाचे माध्यम हे उपयुक्त वाटत होते. धोंडो केशव कर्वे या विचाराशी पूर्णपणे सहमत होते. शिक्षण हाच सामाजिक सुधारणेचा प्रभावी उपाय आहे हे त्यांना मनोमन पटले होते आणि त्यांनी आपले विचार व दृष्टिकोण संस्थात्मक व वैयक्तिक पातळीवर अंमलात आणायला आरंभ केला. विधवाविवाह आणि स्त्रीशिक्षण या कार्याचे ते संघटक बनले. विधवांना समाजात सन्मानाचे स्थान लाभावे, स्वावलंबी होता यावे व त्यांच्या पुनर्विवाहाचा मार्ग मोकळा व्हावा यासाठी त्यांनी प्रचंड परिश्रम केले. त्यांचे हे प्रयत्न त्यांच्या आयुष्यभराच्या आस्थेत–स्त्रीशिक्षणविषयक विविध उपक्रमांत परिणत झाले. कर्वे स्वत: महाविद्यालयात शिकत असतांना त्यांनी [stamp] वाचन केले, नरहरपंत जोशी या मित्राबरोबर जो विचारविनिमय [stamp] आणि पुढे फर्गसन महाविद्यालयात गेल्यानंतर त्याचा परिणाम त्यांच्या मनातील विचारांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात झाला. गोपाळ गणेश आगरकर आणि गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सान्निध्याचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. आगरकर–टिळकांच्या कलहात कर्वे आगरकरांच्या बाजूचे होते. आणि कर्वे यांच्या पुनर्विवाहाच्या प्रकरणात आगरकर त्यांच्या पाठीशी होते. असा हा समसमा संयोग कर्वे यांच्या आयुष्याला वळण लावायला कारणीभूत ठरला.

शिक्षण संपल्यानंतर यथावकाश कर्वे गणिताचे प्रोफेसर झाले, वेगवेगळ्या तत्वज्ञानपर, विज्ञानपर पुस्तकांची भाषांतरे करु लागले. या कामांत ते यशस्वी ठरले. तरीही त्यातच रमावे आणि प्राध्यापकाचे स्वास्थ्यपूर्ण जीवन जगावे असा मोह त्यांना पडला नाही. बुध्दिमत्तेच्या जोरावर संपत्तीची साधना करणे शक्य असतांनाही आणेपैची उठाठेव करून विधवा पुनर्विवाहाच्या कार्यासाठी सरसावून पुढे व्हायचे, दोनचार विद्यार्थीनींपासून आरंभ करुन स्त्रीशिक्षणाच्या कामाला वाहून घ्यायचे, हे वागणं असामान्यच होते. पैसे मिळवून घरदार करावे अगर चैन भोगावी, असा विचार क्षणभरही मला शिवला नाही. अशा प्रकारचा विचार त्या काळी व सर्वकाळी केवळ अपवादात्मक स्वरुपाचा म्हणावा लागतो. वरवर पाहता त्यांनी चिपळूणकर–टिळक–आगरकर यांच्यासारखे असाधारण वर्तन पंचविशी–तिशीपर्यंत केले नाही. ज्याला विशिष्ट ब्राम्हणी म्हणावे असेच त्यांचे वर्तन वाटू शकते परंतु त्यांचे वेगळेपण केवळ काटकसरीने राहाण्यात नाही, समाजकार्य करण्यासाठी आपले पैसे वापरण्यात नाही, स्त्रीशिक्षणाच्या कार्याला पवित्र धर्मकार्य मानण्यात आहे. त्यांची कार्यनिष्ठा इतकी प्रखर की, तीसाठी त्यांनी सगळ्याच गोष्टी त्याज्य मानल्या. नि:स्वार्थ स्त्रीशिक्षणाचा कृतनिश्चय कधी सोडला नाही. १९१६ मध्ये अखिल भारतवर्षीय महिला विद्यापीठाची कर्वे यांनी केलेली स्थापना ही केवळ स्त्रीशिक्षणाच्याच संदर्भात नव्हे तर एकंदर स्त्रियांच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण सुरुवात होती.

कर्वे यांच्या दृष्टीने स्त्रियांच्या उन्नतीसाठी ते करीत असलेले प्रयत्न हे राष्ट्रकार्यच होते. स्वराज्यप्राप्तीच्या वेगवेगळ्या आंदोलनांपासून ते तसे अलिप्त होते याचा अर्थ त्यांनी स्वातंत्र्याकडे पाठ फिरविली होती असे नाही. त्यांनी निवडलेले शिक्षणाचे क्षेत्र हे स्वराज्यप्राप्तीच्या विविध प्रयत्नांचे एक अंगच होते. कॉंग्रेसमधील मवाळ व जहाल यांच्यातील संघर्षाचा काळ आणि आधी राजकीय स्वातंत्र्य की आधी [stamp]जिक सुधारणा यांच्यातील प्रखर विरोधाचा काळ हा सगळा काल[stamp] देशाच्या इतिहासातील चित्तथरारक कालखंड होता. या

Dongar Kathore

Special Issue 174 -New Trends in Academic Libraries and Information Literacy
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
UGC Approved Journal
2348-7143
March-2019
ADK-18-19

# माहिती साक्षरतेतील कौशल्ये आणि सर्वोत्तम पध्दती

**प्रा. अरविंद दशरथ कुरकुरे**
ग्रंथपाल
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता. यावल, जि. जळगाव, महाराष्ट्र

**सार -:**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती ही विविध माध्यमांनी विविध स्वरुपात आणि विविध मार्गांनी प्रचंड प्रमाणात उपलब्ध होत आहे. उपलब्ध माहितीपैकी आपणास हवी ती माहिती मिळविण्याकरिता, तीचा योग्य प्रकारे उपयोग करणे करिता विशेष कौशल्याची गरज भासते. या समस्येवर उपाय म्हणून 'माहिती साक्षरता क्षमता' ही नविन संकल्पना उदयास आली. इंटरनेटच्या उपलब्धतेमुळे व प्रसारामुळे माहिती साक्षरतेच जास्त महत्व प्राप्त झाले.

**प्रस्तावना -:**

२१व्या शतकात माहितीचे महत्व व उपयोग किती आहे याची जाणिव प्रत्येक अभ्यासकाला होत आहे. आपआपल्या क्षेत्रात प्रगती, नविन ज्ञान आत्मसात करण्याकरिता विविध प्रकारची माहिती आवश्यक आहे. डॉक्टर, वकील, इंजिनिअर, शेतकरी, शिक्षक, संशोधक, व्यापारी, व्यावसायिक इ. क्षेत्रात काम करतांना आपल्या व्यवसायातील नविन ज्ञान, बदल, घडामोडी, संकल्पना इ. चा अभ्यास करण्यासाठी माहिती लागते. माहिती हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनलेला आहे.

माहिती साक्षरतेचे शैक्षणिक अभ्यासक्रम अमेरिकेत सन १९८० पासुन तयार करण्यात आले. माहिती साक्षरता ही संकल्पना म्हणजे पूर्वी शैक्षणिक ग्रंथालयातून शिकवल्या जाणाऱ्या सुचियुक्त अभ्यासक्रमाचे आधुनिक स्वरुपच म्हणता येईल.

१९८७ सालच्या पदवीपूर्व शिक्षणासंबंधित अमेरिकेत सादर झालेल्या अहवालात विद्यार्थ्यांना तो स्वयम निर्देशित स्वतंत्र शिक्षणार्थी कसे होता होईल\ तसेच, त्याला आयुष्यभर निरंतर शिक्षणार्थी कसे होता येईल\ या बाबतच्या शिक्षणाची गरज स्पष्ट करण्यात आली. ही गरज लक्षात घेवुन अमेरिकन लायब्ररी असोशियनने पायाभूत काम करण्याची जबाबदारी घेवुन तसा अभ्यासक्रमही तयार करुन राबविण्याची योजना अंमलात आणली. या संदर्भात 'असोशियन ऑफ कॉलेज ॲण्ड रिसर्च लायब्ररीज' या शाखेने पाच मानके प्रसृत करुन त्यात प्रत्येक मानकासाठी क्षमता निर्देशक व अपेक्षित परिणाम तयार केले आहेत. इंग्लंड मध्ये स्कोनुल(SCONUL – Standing Conference on National and University Libraries) या संघटनेने माहिती कौशल्या संदर्भात सातस्तंभिय शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रयोजन केले. ज्यामध्ये आय.टी कौशल्य हा आवश्यक मुद्दा लक्षात घेतला गेला आहे. माहिती साक्षरतेचे कार्यक्रम विविध देशांमध्ये आज प्रामुख्याने राबवले जात आहे. हे कार्यक्रम राबवतांना ग्रंथपाल समुहास भागीदार म्हणून महत्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक संस्था करु लागल्याने माहिती साक्षर नागरिक बनविण्याची जबाबदारी ग्रंथपालांनाच पार पाडावी लागेल यात शंका नाही. त्याकरिता आधी ग्रंथपालांनी या क्षेत्रात पारंगत असणे गरजेचे आहे जेणेकरुन माहिती साक्षरता या विषयाबद्दल विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान मिळेल.

**माहिती साक्षरता संकल्पना व व्याख्या -:**

माहिती साक्षरता म्हणजे विविध क्षमतांचा एकत्रित परिणाम, ज्यामध्ये व्यक्ती आपणास हव्या असलेल्या माहितीची गरज ओळखू शकते, तसेच ती शोधण्याची, तीचे मुल्यमापन करण्याची आणि ती परिणामकारकपणे वापरण्याची क्षमता प्राप्त करु शकते.

Dongar Kathore

SBP-19-20

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार

डॉ. सुरेश बी. ढाके
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर अॅप्लीकेशन
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता. यावल.

**प्रस्तावना:**

महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार हे सत्य,अहिंसा, श्रम आणि प्रतिष्ठा व साधेपणा या तत्वावर आधारित आहेत. त्यांच्यामते अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांना परस्परांपासून वेगळे करण्याचे कारण नाही.त्यांचे विचार हे व्यवहारवादी होते. किमान गरजा आणि साधी राहणी गृहित धरून त्यांनी आपले आर्थिक विचार मांडले. मनुष्याने आपल्या गरजा मर्यादित केल्या,राहणी साधी ठेवली तर मनुष्याला सुख आणि समाधान प्राप्त होईलअसे महात्मा गांधींना वाटत होते. महात्मा गांधी यांनी मांडलेले काही आर्थिक विचार खालिलप्रमाणे आहेत-

**१) विशस्त कल्पना :**

गांधीच्या आर्थिक विचारात विशस्ताची कल्पना हा एक महत्वाचा भाग आहे.गांधीजींनी सत्य आणि अहिंसा या तत्वाचा पुरस्कार केलाच पण त्यांच्याबरोबर अपरिग्रह या कल्पनेतूनच विशस्ताची कल्पना निर्माण झाली. अरिग्रह म्हणजे संग्रह न करण्याची वृती . महात्मा गांधी च्या मते समाजातील लोकांनी संपत्तीचा मालमत्तेचा संग्रह न करण्याचे ठरविले तर समाजातील आर्थिक विषमता कमी होईल.सर्व प्रकारच्या विषमतेला गांधीजींचा विरोध होता.परंतु खाजगी मालमत्तेच्या विरूध्द ते नव्हते.खजगी मालमत्तेचा दुरूपयोग होऊ नये असे त्यांना वाटत असे.त्यांच्यामते समाजातील लोकांनी स्वत:च्या गरजा पूर्ण होतील एवढी संपत्ती स्वत:जवळ ठेवावी आणि राहिलेली संपत्ती समाजासाठी वापरावी.त्यांच्यामते आदर्श समाजात अपरिग्रह वृती जोपासली पाहीजे. तेव्हा समाजातील विषमता विषमता कमी होई पर्यंत श्रीमंत लोकांनी संपत्तीचे मालक न समजता विशस्त समजावे अशी गांधीजींची अपेक्षा होती. महात्मा गा धी यांच्यामते एखादया व्यापाऱ्याला धंद्यात नफा झाला असेल तर ती सर्व संपती त्यांच्या मालकीची नसून समाजाच्या मालकीची असते.

**२) सर्वोदय:**

सर्वोदय या कल्पनेचा वापर करणारे , आधुनिक काळातील गांधीजी कदाचीत पहिले विचारवंत असतील. सर्वोदय या संकल्पनेचा अर्थ सर्वांचा उदय किवा सर्वांचे कल्याण असा होतो.समाजातील सर्व घटकांचे कल्याण व्हावे असे गांधीजींना वाटत होते.त्यामुळेच त्यांनी सर्वोदय या कल्पनेचा आधार घेतला .बेथेम यांनी मांडलेली कल्याणाची कल्पना महात्मा गांधी यांना अपुरी वाटली आणि म्हणून गांधी यांनी सर्वोदयाची कल्पना मांडली.कालांतराने सर्वोदय ही कल्पना त्यांच्या जीवनाचा आधार बनली . महात्मा गांधी यांच्यामते सर्व प्रकारच्या राजकीय आणि सामाजिक दु:खावर सर्वोदय रामबाण औषध ठरेल. महात्मा गांधीनी सर्वोदयाची कल्पना मांडताना भिन्न भिन्न विचारसरणीमधील चांगल्या कल्पनांचा स्विकार करण्याची आणि वाईट-कल्पनांकडे दुर्लक्ष करण्याची भुमिका स्विकारली .जसे सर्वोदय कल्पना,भांडवलशाही, समाजवादी आणि लोकशाही समाजवादाच्या विरोधी आहे असे नाही. या कल्पनात चांगल्या गुणांचा स्विकार व वाईटांचा त्याग केलेला आहे. महात्मा गांधी यांना असे वाटत होते की, सध्याची अर्थव्यवस्था मानवी मूल्य,विशास आणि समाजाची वागणूक यामध्ये सर्वोदयाद्वारे आमुलाग्र बदल करता येऊ शकेल. महात्मा गांधीजींच्या मते सर्वोदयामध्ये जीवनाच्या सामाजिक,राजकीय बाजूंचा अभ्यास अपेक्षित आहे. सर्वोदयाची कल्पना भारतीय भारतीय संस्कृती आणि भारतीय जीवनांचे आदर्श या कल्पनावर उभी आहे.सर्वांचे कल्याण साधणे हे सर्वोदयाचे उदिष्ट असल्याने साहजिकच या चळवळीद्वारे प्रत्येकाला काम, पुरेसे अन्नवस्त्र आणि निवारा मिळण्याची खात्री होईल.

**३) ग्राम स्वराज्य :**

ग्रामीण भागात सुप्त बेकारी , ग्रामीण लोकांची कामासाठी शहरी भागाकडे धाव असे प्रकार त्याकाळात नव्हते. याचाच अर्थ लोकांचे जीवन परिपूर्ण होते.म्हणूनच महात्मा गांधी म्हणत असत की, खरा भारत खेडयात नांदतो,म्हणूनच खेडयाकडे चलो



Dongar Kathore

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 224 (A) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार

प्रा. डॉ. विनोद झामा मोरे
सहाय्यक प्राध्यापक -अर्थशास्त्र विभाग
कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन
महिला महाविद्यालय डोंगरकठोरे,
ता.यावल.जि.जळगांव
मो.नंबर-७७०९४१८३८०
Email-vzmore39@gmail.com

**प्रस्तावना -**

मानवतेचे थोर उपासक राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरात राज्यातील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. शालेय शिक्षण पोरबंदर येथे झाले. त्यांचे विद्यार्थिजीवन फारसे चमकदार नव्हते, मात्र पुढे त्यांच्या बंधूंनी गांधीजींना शिक्षणासाठी विदेशात पाठविले .तेथे त्यांनी कायद्याचाअभ्यास केला. कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर गांधीजींनी भारतातच वकिली व्यवसायास प्रारंभ केला. एका भारतीय व्यावसायिकाचा खटला चालविण्यासंदर्भात ते दक्षिण आफ्रिकेत गेले व त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे प्रसंग घडले. गांधीजींवर टॉलस्टॉय, रस्किन आणि थोरो या तत्वज्ञांच्या विचारांचा विलक्षण प्रभाव पडला. टॉलस्टॉय यांच्या ' किंगडम ऑफ गाड विदिन यू ' या ग्रंथातील संदेशामुळे गांधीजी भारावून गेले होते. ते अहिंसेचे पुजारी व सत्याचे उपासक बनले. अहिंसक युध्द व शांततामय क्रांती या अद्भुत संकल्पनांच्या आधारे गांधीजींनी अभिनव चळवळ भारतातील जनतेसमोर मांडली. सत्य आणि अहिंसा या दोन तत्वांची आयुष्यभर त्यांनी जोपासना केली. त्यांच्या संपूर्ण चळवळीला नीतिशास्त्राचा आधार होता. रचनात्मक कार्यक्रमावर त्यांनी भर दिला. खादी व ग्रामोद्योगास उत्तेजन दिले. सामाजिक भेदाभेद नष्ट करण्यासाठी अहर्निश प्रयत्न गांधीजींनी केले.

गांधीजींच्या प्रेरणेने १९४२ साली ' चले जाव 'आंदोलनास प्रारंभ केला. ब्रिटिशांनी सविनय कायदेभंग , स्वदेशी , सत्याग्रह या शस्त्रासह यशस्वी लढा देऊन साम्राज्याचा पाया खिळखिळा केला. गांधीजींनी ' यंग इंडिया ' आणि ' हरिजन ' ही दोन नियतकालिके चालविली . यात त्यांनी वैचारिक विश्लेषण व विविध प्रश्नांवर चिंतन केले. माझे सत्याचे प्रयोग, सर्वोदय,खादी, आत्मशुध्दी या ग्रंथाचे लेखन त्यांनी केले . १९२० ते १९४८ हा काळ ' गांधीयुग ' म्हणून ओळखला जातो. ३० जानेवारी १९४८ रोजी प्रार्थनेला जात असताना नथुराम गोडसे या माथेफिरु इसमाने त्यांच्यावर बंदुकीने जवळून गोळ्या झाडल्या. त्यातच त्यांना हौतात्म्य प्राप्त झाले.

**महात्मा गांधीजी यांचे आर्थिक विचार -**

म.गांधी यांचे आर्थिक विचार हे सत्य,अहिंसा,श्रम आणि प्रतिष्ठा व साधेपण या तत्वावर आधारित आहेत. त्यांच्या मते अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांना परस्परापासून वेगळे करण्याचे कारण नाही. त्यांचे विचार हे व्यवहारवादी होते. किमान गरजा आणि साधी राहणी गृहीत धरुन त्यांनी आपले आर्थिक विचार मांडले. मनुष्याने आपल्या गरजा मर्यादित केल्या , राहणी साधी ठेवली तर मनुष्याला सुख आणि समाधान प्राप्त होईल असे म. गांधीना वाटत होते. महात्मा गांधी यांनी मांडलेले काही आर्थिक विचार पुढीलप्रमाणे आहेत.

**१) ग्रामस्वावलंबन (Village Self Sufficiency) :**

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यामधील स्वावलंबी संस्कृतीचा स्वयंपूर्ण खेड्यांचा गांधीजींना अभिमान वाटत असे . त्यांच्या मते, इतिहासकाळात खेडे स्वावलंबी असत तर शहरे परावलंबी असत. आज शहरे स्वावलंबी आणि खेडी परावलंबी होत आहेत. गांधीजींना देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी व स्वायत्त लोकराज्य व्हावे असे वाटत होते. या गावात त्या गावाच्या सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता असावी. गावातील सर्व नागरिकांच्या सर्व प्रकारच्या गरजा तसेच सामाजिक व सांस्कृतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व सेवांची निर्मिती प्रत्येक गावात झाली पाहिजे. धान्य,कापूस,कापड शाळा, क्रीडांगणे, गुरांसाठी चारा इत्यादीचे पुरेसे उत्पादन गावातच व्हावे. शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतजमिनीत अन्नधान्य,



Dongar Kathora

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
ISSN : 2348-7143
December 2019

# भारतीय महापुरुषाचे आर्थिक विचार.

प्रा.डॉ. विनोद झामा मोरे
सहाय्यक प्राध्यापक – अर्थशास्त्र विभाग कला, वाणिज्य व कॉम्प्युटर अप्लीकेशन,
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता. यावल जि. जळगाव

**प्रस्तावना –**

अर्थशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात व्यापारवादी आणि निसर्गवादी विचारवंतांनी मांडलेल्या विचारापासून झाली असे मानले जाते. परंतु ख–या अर्थाने अर्थशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात १७७६ मध्ये 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथाच्या प्रसिद्धीपासून म्हणजेच अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून झाली असेच समजले जाते. १७७६ नंतर युरोपातील आणि अमेरिकेतील अनेक विचारवंतांनी अर्थशास्त्रात महत्त्वपूर्ण भर टाकून अर्थशास्त्राला समृद्ध केले.

अलीकडच्या काळात भारतातील आर्थिक विचारांची ओळख व्हावी म्हणून काही प्राचीन भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा अभ्यास करण्यात सुरुवात झालेली आहे. भारतात प्राचीन काळी आर्थिक विचारवंत होते असा उल्लेख आढळतो. परंतु त्यांच्या विचारांवर आर्थिक व नैतिक विचारांचा पगडा पडलेला होता. मध्ययुगीन काळात आर्थिक विचारांना तितकेसे महत्त्व दिले गेलेले नव्हते. कारण ब्रिटिश व मोगलांच्या आक्रमणामुळे भारतीयांचे जीवन विस्कळीत झाले होते. मोगलांच्या काळात आर्थिक व सामाजिक व्यवस्था नष्ट झाली होती. त्यावेळी कवींच्या व संतांच्या विचारांचे इकडेतिकडे तुटक असे आर्थिक विचार सापडतात त्यांनी आर्थिक समानतेवर अधिक भर दिलेला दिसतो.

ब्रिटिश काळात भारताचा आर्थिक विकास जवळ–जवळ झालाच नाही. त्यावेळी फक्त एकांकी स्वरूपाचा विकास झाला. पण तोही विकास ब्रिटिशांना हितकारक स्वरूपाचा होता. त्यांनी भारतातील लघु उद्योग नष्ट केले. सर्व कच्चामाल इंग्लंडला नेऊन पुन्हा तोच माल पक्क्या स्वरूपात भारतात विकून भारतीयांचे शोषण मोठ्या प्रमाणात केले. त्यांनी शेती उत्पादन क्षेत्रात तेवढाच विकास घडवून आणला जितका की, त्यांच्या हिताचा होता. आपल्या पूर्वजांनी देखील आर्थिक पैलुचा सखोल अभ्यास केला होता. परंतु त्याकाळी अर्थशास्त्राला वेगळे शास्त्र म्हणून समजले जात नव्हते. धर्मशास्त्र नीतिशास्त्र राज्यशास्त्र इत्यादी शास्त्रांचा एक भाग म्हणून या शास्त्राकडे पाहिले जात असे. परिणामी अर्थशास्त्राची व्याख्या, व्याप्ती स्पष्ट करणे शक्य होत नाही. आज उपलब्ध असलेल्या पुरातन साहित्यात सर्वात जास्त महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ म्हणून कौटिल्य यांच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथाचा उल्लेख केला जातो.

**कौटिल्य –**

कौटिल्य, आर्य चाणक्य विष्णुगुप्त या नावाने ओळखला जातो. कोणत्याही राजाला राज्यकारभार योग्य प्रकारे चालविता यावा, यासाठी कौटिल्य यांनी ''अर्थशास्त्र'' हा मार्गदर्शक ग्रंथ लिहिला. कौटिल्याच्या मते अर्थशास्त्र धर्मशास्त्राहून वेगळे आहे. राज्याचा एकमेव उद्दिष्ट लोककल्याण साधणे हा असावा असे कौटिल्यांचे मत होते.कौटिल्य यांनीआपल्या ग्रंथात गाव आणि खेड्याचे शासन, न्यायदान राजस्व, शेती व्यापार इत्यादी अनेक विषयांची चर्चा केली आहे. कौटिल्य यांनी मांडलेले प्रमुख आर्थिक विचार पुढीलप्रमाणे आहेत.

**कौटिल्यांचे आर्थिक विचार –**

१) संपत्तीचे स्वरूप आणि उद्देश –

कौटिल्याच्या मते अर्थशास्त्र हे 'अर्थाचे' म्हणजेच संपत्तीचे शास्त्र आहे. संपत्तीच्या कल्पना व्यक्तीच्या गरजा आणि कल्याण यांच्याशी संबंधित होत्या. कौटिल्याच्या मते संपत्ती ही संकल्पना बरीच विस्तृत आहे. एखाद्या वस्तूच्या संपत्तीत समावेश करण्यासाठी त्या वस्तूत काही गुणधर्म वैशिष्ट्ये आवश्यक असतात. संपत्ती म्हणजे वास्तविकता उपभोगक्षमता, हस्तांतरण आणि मालकी हक्क प्रस्थापित करणे हे वैशिष्ट्ये असणा–या कोणत्याही भौतिक वस्तूला संपत्ती म्हणता येते. या वैशिष्ट्यांमुळेच त्यांनी १) पैसा आणि वस्तू २) मिळविता येण्यासारखे धन ३) खासगी आणि


Dongar Kathore

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.625, | February-2020
Special Issue 224 (B) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal

# महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार

डॉ . आशालता के. जावळे
कला,वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन,
महिला महाविद्यालय,डोंगर कठोरे,
ता.यावल,जि.जळगाव.
मो.नं.९४२३११००७४

## प्रस्तावना

महात्मा गांधी यांना स्वयंभू शिक्षण विचार विकसित करायचा होता.त्यासाठी त्यांनी २२,२३ व २४ ऑक्टोबर १९३७ रोजी वर्धा येथे झालेल्या शैक्षणिक परिषदेतून आपले शिक्षण विषयक विचार मांडले. त्यांच्या शिक्षण पध्दतीला वर्धा योजना , मूलोद्योगी शिक्षण, नई तालीम, बुनीयादी शिक्षण व जीवन शिक्षण इ. नावे दिली आहेत.गांधीजी म्हणत मी हिंदुस्थानला अनेक गोष्टी दिल्या .त्यात मी दिलेली वर्धा शिक्षण योजना व शिक्षण पध्दती ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे . वर्धा शिक्षण योजना ही त्यांच्या जीवनभर चालविलेल्या मंथनातील अमृत आहे. राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करतांना त्यांनी भारतातील तत्कालीन परिस्थिती, इंग्रजांचे धोरण आणि भारतीय शिक्षणसंस्था पुढील आव्हाने या सर्व बाबींचा विचार करून नवा विचार विकसित केला. या शिक्षण विचारामध्ये स्वावलंबन, आत्मसन्मान आणि श्रमप्रतिष्ठा ही तीन मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाच्या प्रक्रियेत हाताचे सुयोग्य स्थान पहिल्यांदा गांधीजींनीच निर्धारित केले. ही त्यांची शिक्षण क्षेत्रास मिळालेली देणगी होय. गांधीजींची शिक्षण योजना परिपूर्ण होती हे त्यांनी समाजशिक्षण,प्रौढ शिक्षण, स्त्रिशिक्षण, हरिजन शिक्षण व विद्यापीठीय शिक्षण इ. संबंधी केलेल्या विवेचनावरुन दिसते. गांधीजींचा शैक्षणिक विचार शिक्षण आणि राष्ट्रजीवन यांना जोडणारा आहे. तसेच व्यक्तीमत्वाच्या विकासातील बौध्दिक विकास, आध्यात्मिक विकास आणि शारीरिक विकास या तिनही दृष्टीने व्यक्तिमत्वाच्या सकल अंगांना स्पर्श करणारा आहे.मी पक्षा आम्ही महत्वाचा आहे.आपण सर्वांनी मिळून राष्ट्रजीवन बदलावयाचे आहे असा त्यांच्या स्वच्छ, सुस्पष्ट आणि पारदर्शी विचार होता.

स्वावलंबन, स्वयंपूर्णता व चरित्र संवर्धन ही गांधीप्रणित शिक्षण विचारांची उद्दिष्टये आहेत. गांधीजींनी शिक्षण प्रक्रियेत श्रमास अधिक महत्त्व दिले. शिक्षणामुळे बुध्दी, कृती व भावना यांचा समप्रमाणात विकास व्हावा असे त्यांचे मत होते. शिक्षणाच्या माध्यमातून क्षमता, सहिष्णुता व सहकार्य निर्मिती झाली पाहीजे. संस्कृती हा शिक्षणाचा पाया आहे. विद्येचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये नैतिकवृत्ती दृढ करण्यासाठी झाला पाहिजे. असे त्यांचे मत होते.

## शिक्षणाच्या माध्यमासंबंधी विचार

मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे. इंग्रजी माध्यम असणारी शिक्षण पध्दती चुकीची आहे. असे गांधीजींचे मत होते. सर्व शिक्षण विद्यार्थ्यांना प्रादेशिक भाषेतून दिले जावे कारण भारतीय परंपरा, संस्कृती, साहित्य व कला यांपैकी कोणत्याही गोष्टीशी इंग्रजी भाषेचा मेळ बसत नाही म्हणून प्रांतिय भाषेचा दर्जा व व्यावहारिक महत्व वाढावे अशी गांधीजींची इच्छा होती. इंग्रजी ही आमच्या गुलामगिरीची व अधःपतनाची स्पष्ट निशाणी आहे असे गांधीजींना वाटत असे. विज्ञान, व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यवहार या क्षेत्रातील इंग्रजीचे महत्व गांधीजीना मान्य होते. मात्र इंग्रजी भाषेची सक्ती असु नये. असे त्यांचे मत होते.

## शिक्षकासंबंधी विचार

शिक्षकाचे कार्य केवळ ज्ञानदान नसून विद्यार्थ्यांमध्ये सत्य, सहिष्णुता व सहानुभूती निर्माण करणे हे ही आहे. असे त्यांचे मत होते. शिक्षकच विद्यार्थ्यांचे खरेखुरे पाठ्य पुस्तक आहे असे गांधीजींना वाटत असे. शिक्षक हा उत्साही, कल्पक, चारित्र्यसंपन्न व श्रध्दावान असला पाहिजे. स्वतःच्या विषयाचे त्याला पूर्ण ज्ञान असले पाहिजे. चारित्र्यहिन शिक्षक हा रुचीहीन मिठासारखा होय असे गांधीजींना वाटत असे.

Dongar Kathore

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 1
Peer Reviewed Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan. Feb. March. 2020

# प्रसार माध्यमे व सामाजिक विकास

**डॉ. आशालता के. जावळे**
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, महिला महाविद्यालय,
डों. कठोरे, ता.यावल, जि.जळगाव.
Gmail- mahajanashalata@gmail.com
मो.नं. ९४२३' ...०७४

**प्रस्तावना :-**

प्रसार माध्यमे ही समाज बदलाची साधने आहेत. लोकजागृतीसाठी विविध प्रसार माध्यमांचे मोठे योगदान लाभले आहे. माहिती देणे, लोकशिक्षण, मनोरंजन या वैशिष्ट्यांमुळे समाजमनावर त्यांचा प्रभाव दिसून येतो. प्रसार माध्यमांचे क्षेत्र दिवसागणिक विस्तारत आहे. माहिती देणे, शिक्षण देणे, मनोरंजन करणे व प्रबोधन करणे ही चतुःसूत्री प्रसार माध्यमांचा आत्मा आहे. वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, ऑनलाईन पत्रकारिता या माध्यमातून पत्रकारिता सामाजिक कार्य करीत असते. काळानुरुप पत्रकारितेच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल झालेले आहेत. माध्यमांचे क्षेत्र तर विस्तारले आहे त्यासोबत कार्यपध्दतीही बदलत आहे. बदलती कार्यपध्दती चांगले व वाईट परिणाम देणारी आहे. प्रसारमाध्यमे ही समाजाचा आरसा आहेत. समाजात घडलेली प्रत्येक घडामोड टिपून तिला घराघरात पोहचविण्याचा व्यवसाय ते करत असतात. आज वेगवेगळी माध्यमे नकळतपणे आपल्या जीवनव्यवहाराला जोडली गेली आहेत. प्रसारमाध्यमांनी आपल्याला इतके घट्ट कवेत घेतले आहे की आपण कितीही प्रयत्न केले तरीही मिठी सैल करणे शक्य नाही. आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्रे, इंटरनेट, फोन, चित्रपट , नाटक आणि लेखनग्रंथ ही सर्व प्रसारमाध्यमे आपल्या रोजच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करतात. आपल्या विचाराला आणि कृतीला ती जोडली जातात. एकुणच माहितीसाठी व्यक्ती पर्यायाने समाज प्रसार माध्यमांवर अवलंबून आहे. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी प्रसारमाध्यमे ही आवश्यक झाली आहेत.

**प्रसारमाध्यमांची समाजव्यवस्थेतील भूमिका :-**

विकास वाढीसाठी परिवर्तनाचा विचार आणि विस्तार करण्यासाठी प्रसारमाध्यमे फार मोठे अनुकूल साधने ठरतात. विकास विषयक प्रतिमानांचा विचार करीत असतांना केवळ भौतिक विकासासोबत जनतेचा मानसिक विकास होणे, त्यांचे वर्तन परिवर्तन महत्वाचे असते कारण विकासाची सर्व साधने उपलब्ध असूनही समाजाची मानसिकता बदलत नसेल तर खऱ्या अर्थाने विकास घडून येणे अवघड असते. मनाच्या विकासातून माणसाची मनोभूमिका प्रगल्भ होणे गरजेचे असते. शिक्षणाची सतत ही धडपड असते. माध्यमे अशा प्रकारचे शिक्षण विविध संदेशाच्या मार्फत देत असतात. विकासात्मक प्रक्रिया साधत असतांना समाजाला विविध समस्यांमधून जावे लागत असते. या सर्व समस्या आणि अडचणींचे निराकरण करण्यासाठी वैचारिक भूमिका प्रगल्भ करण्याचे, लोकशाही जीवनपध्दती रुजविण्याचे महत्वाचे कार्य प्रसारमाध्यमे करीत असतात. समाज व्यवस्था टिकवून ठेवणे, त्यासाठी स्थैर्य, समता व शांततेचे वातावरण निर्माण करणे आज फार मोठी समस्या होऊन बसली आहे. "समाज व्यवस्था टिकवून ठेवणे व तिच्यात निरोगी विचारप्रवाह सातत्याने गतिमान ठेवणे ही माध्यमांची प्रमुख कामगिरी असते."१ आपल्या देशात विविध जाती धर्मांचे लोक राहतात. त्या सर्वांमध्ये एकात्मता आणि समरसता आणण्याचा प्रयत्न केवळ शिक्षणातून होणे संभवनीय नाही. समाजात एक दुसऱ्याबद्दलचा द्वेष धुमसत असतो. त्यामुळे अनेक जातीय दंगे वेळोवेळी भडकतात अशावेळी समाजातील कटुत्वाची भावना कमी करण्याचे आव्हान माध्यमांना पेलावे लागते. सामाजिक परिवर्तन आणि विकासाच्या माध्यमातून नवा समाज घडविण्यासाठी शिक्षणाची जेवढी आवश्यकता आहे तेवढी प्रसारमाध्यमांची देखील आवश्यकता



Dongar Kathore
Scanned with CamScanner

SMD-1920

Power of Knowledge Peer Review Journal,Volume : III, Issue :III Oct. to Dec. 2019 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

# भास्कर चंदनशीव यांच्या ग्रामीण कथासाहित्यात चित्रित झालेले वंचिताचे प्रश्न

प्रा.डॉ.शकुंतला एम.भारंबे

कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन महिला महाविद्यालय,

डोंगरे कठोरा, ता.यावल जि.जळगांव

कथा हा काव्याइतकाच प्राचीन प्रकार आहे. महाकाव्यादि काव्यातून अनेक कथा [illegible] झाल्या आहेत. आंग्ल संपर्काने आधुनिक मराठी साहित्यावर फार मोठा परिणाम झाला. मध्यवर्ती [illegible]जले जाणारे मराठी साहित्य मध्यमवर्गीय नागर अभिरुचीतून निर्माण होऊ लागले. मात्र म. फुले व सत्यशोधक समाजाने श्रमिक, वंचित शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. शेतकरी हा देशाचा नायक आहे हे सत्य प्रथम ठोसपणे वाचकांपुढे प्रतिपादले. खेडेगावातील हा अफाट ग्रामसमुदाय म्हणजेच खरा भारत देश आहे अशी त्यांची भुमिका होती. म. फुले यांच्या 'शेतकऱ्यांच्या आसूड' पासूनच खरे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फुटलेली आहे. ग्रामीण कथा साहित्य हे दलित कथा साहित्याइतकेच विद्रोही नसेल पण प्रस्थापित विषमताधिष्ठित शोषक समाजव्यवस्थेच्या विरुध्द त्याने बंडाचे निशाण उभारलेले दिसून येते म्हणूनच ग्रामीण कथासाहित्याला सर्व शोपितांचे, वंचितांचे खुले व्यासपीठ म्हटले जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेती क्षेत्रात आमुलाग्र बदल झाले. सहकार औदयागिकीकरण आणि राजकारण यांनी हातात हात गुंफले आणि पुन्हा शोषणव्यवस्थेचा चेहरा बदलला. स्वातंत्र्यप्राप्तीआधीही शेतकरी वंचित घटक होता आणि आताही तो वंचितच आहे. त्याच्यापुढे जीवन जगण्याच्या वेगवेगळया संदर्भात प्रश्नांची मालिकाच उभी राहते.

भास्कर चंदनशीव हे ग्रामीण कथाकार असून त्यांची कथा ग्रामीण संवेदना केंद्रस्थानी घेऊन आकारास आली. ती ग्रामीण समकालीन वास्तवाला थेट सामोरी जाणारी आहे. या ग्रामीण भागातील जनसमुदाय म्हणजेच भारत देश आहे. हा शेतकरी जगाचा पोशिंदा आहे हे ओळखूनच त्यांच्या काही कथांचा नायक शेतकरी आहे. या नायकाला कोणत्या ना कोणत्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यांची 'बिरडं' ही कथा कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्याच्या होरपळीची कर्मकहाणीच आहे. संबंध गामजीवन प्रचंड दारिद्रय आणि भयावह उदध्वस्तपणाने भरलेले आहे. शेतकऱ्याची सुगी पिकली की त्याच्यातील दानशूर कर्ण जागा होतो. पण दुष्काळाचे संकट आले की तो पार कोसळून जातो, कोलमोडून पडतो, ढसढसून रडतो. कायमस्वरुपी कवाडाचे धनी होऊन जगणारा शेतकरी किती दुःखी-कष्टी असतो याची जाणीव करुन देणारी, कारुण्याच्या सहवेदनेवर नेऊन सोडणारी ही कथा आहे. दारिद्रयाने त्रस्त झालेल्या गणाभाऊची व्यथा या कथेत चित्रित झालेली आहे. बैल गहाण ठेऊन आर्थिक नड भागविणाऱ्या सामान्य शेतकऱ्याच्या दुःखाची तीव्रता वाचकांना अस्वस्थ करणारी आहे. शोषित शेतकरी सावकाराच्या पाशात अडकतो त्याची जगण्यासाठी जीवघेणी धडपड परिणामकाररितीने या कथेत व्यक्त झालेली आहे.

'काळइळा' या कथेत बहुजन समाजातील शेतकऱ्याच्या शापित पिढयांचा इतिहासच दृष्टीस पडतो. ग्रामीण भागातील शेतकरी दारिद्री अवस्थेत जगत असला तरी आपला मुलगा खूप शिकून चांगल्या नोकरीला लागेल अशी आशा बाळगणारा आहे. आपल्याला जे सुख मिळाले नाही ते सुख आपल्या मुलाला मिळाले पाहिजे असे त्यांना वाटते. यासाठी माय-बाप खुप खस्ता खातात. मराठा-पाटील कुटुंबातील असूनही बलुतेदारांच्या घरी उसने पैसे मागायला जाते पण तिला पैसे मिळत नाही ही खंत व्यक्त करतांना ती म्हणते, "काय करावं? कुठं जावं? माणसाची दानतबी आटत चाललीया, अ[illegible]टावर सुध्दा कुणी फुकट मुतायचं

Dongar Kathora

SMB-19-20

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 6, Issue 4 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

# संत चोखोबा : भक्ती आणि कवित्व

**प्रा. डॉ. शकुंतला एम.भारंबे**
कला,वाणिज्य व कॉम्प्युटर अॅप्लीकेशन
महिला महाविदयालय,डोंगर कठोरे
Mob.No.9423279734
smbharambe37@gmail.com

नामदेवकालीन संत चोखोबा यांच्या जन्मस्थळाविषयी वेगवेगळी मते आढळून येतात. चोखोबांचे जन्मगाव पंढरपूरपासून काही अंतरावर असलेले मंगळवेढा हे होत. परंतु काहींच्या मते त्यांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्हयात वसलेले मेहूणपूरी किंवा 'मेहूण' या गावी झाला. तर संत नामदेवांच्या अभंगात कोरेगावचा उल्लेख आहे. त्यांचे आई-वडिल हे पांडुरंगाचे भक्त होते. त्यांच्या आई-वडिलांची पांडुरंगावर निष्ठा होती. या भक्तीचा संस्कार चोखोबावर झाला. त्यांची राहणी फार स्वच्छतेची होती. आपल्या नेहमीच्या कार्याबरोबर पांडुरंगाचे ध्यान करीत असत. चोखोबा महार जातीचे असल्यामुळे त्या काळात समाजाकडून अनेक हीन दर्जाची कामे करुन घेतली जात होती. समाजाकडून प्राप्त झालेली जी ती कामे असतील ती मोठ्या निष्ठेने स्वीकारुन ती पूर्ण करणे हेच या समाजाचे काम होते. त्यांच्या जवळ प्रामाणिकपणा, विश्वासूवृत्ती, शूरपणा व पैराक्रमीवृत्ती हे गुण असूनही या समाजात अस्पृश्य म्हणून मानहानीचे व हीनतेचे जीवन जगावे लागत होते. ते महार जातीचे असले तरी आचरणाने ब्रम्ह जाणणारे होते. बंका महार आपल्या अभंगात म्हणतात -

"चोखा चोखट निर्मळ | त्या अंगी नाही मळ
चोखा सुखाचा सागर | चोखा भक्तीचा आगर"१

महार जातीतील अनेक भावीक या भक्तीमार्गाकडे वळले. चोखामेळा हे यात प्रमुख होते. सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने अतिशुद्र गावाबाहेर नांदणारे, दुःख आणि दैन्य यांचा वारसा वागवणाऱ्या कुळातले आणि गाव सांगेल ते सष्ट करणारे, गाव देईल ते खाऊन जगणारे होते. त्यांना त्या जीवनात अनंत अशा मरणप्राय वेदना सहन कराव्या लागत होत्या. ज्ञानदेवांनी चोखेबा व अनेक दीनदलित संतांना परमार्थाची वाट मोकळी करुन दिली. ज्ञानदेवांनी सांगितलेला भक्ती मार्गाचा अवलंब चोखेबांनी मोठ्या निष्ठेने उरी बाळगून त्यानुसार आपला जीवनमार्ग स्वीकारला. त्यांचे सर्व कुटुंबच विठ्ठल भक्तीत रंगून गेले होते. त्यांची पत्नी सोयरा, बहिण निर्मला, मेहूणा बंका व मुलगा कर्ममेळा असे सर्व कबाडकष्ट करीत असतांनाच नित्यनियमाने व मोठ्या भक्ती भावाने पांडुरंगाचे नामस्मरण करीत असत. पांडुरंगाच्या भक्तीने त्यांच्या सर्वांचा शीण नाहीसा होत होता. त्यात त्यांना समाधान लाभत होते.

"सुखाशी मिराशी | आमुची हे पंढरीशी |"२|

असे त्या सर्वांचे मत होते. संत नामदेवांची कृपादृष्टी आपल्यावर झाली तरी सुध्दा विठ्ठलाचे दर्शन आपल्याला दुरुनच का घ्यावे लागते? इतरांसारखेच आपण असूनही आपल्याला मंदिरात प्रवेश का नाही? ही संत चोखोबांच्या मनात होती पण कधी कधी स्वतःच स्वतःचे समाधान करीत असत की लांबून का होईना आपल्याला परमेश्वराची भक्ती करता येते अशी श्रध्दा चोखोबांची होती.

संत. चोखामेळा यांच्या चरित्रात त्यांच्याविषयी अनेक चमत्कार नोंदविले आहेत. ज्याप्रमाणे जनाबाईच्या दळणकांडणात मदत म्हणून प्रत्यक्ष पांडुरंगाने सेवा केली त्याप्रमाणे संत चोखामेळाबरोबर पांडुरंगाने मेलेली गुरे ओढण्याचे काम केले. महारांना देवळात जाऊन दर्शन घेण्यास मनाई होती पण तरीही चोखोबा दुरुनच देवाचे दर्शन घेत असे पण मनात खूप व्यथित होत असे. अशा या भक्तासाठी पांडुरंगाने प्रत्यक्ष देवळात नेऊन दर्शन दिले व आपला रत्नहार, तुळशीची माळ चोखोबांच्या गळ्यात घालून कपाळी बुक्का लावला. तसेच त्यांच्या पुत्रप्राप्तीबद्दल चमत्कार

Dongar Kathora

SMB-19-20

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 224 (A) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# गांधी विचारांचा बारोमास मधील एकनाथवर पडलेला प्रभाव

प्रा. डॉ. शकुंतला एम. भारंबे
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन महिला महाविद्यालय,
डोंगर कठोरे, ता. यावल, जि. जळगांव.

आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गांधीजींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. आंदोलनातील भारतीयांच्या कृतींचा आधार गांधी तत्वज्ञानात होता. महात्मा गांधींनी स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात केवळ ब्रिटिशांशी असहकार केलेला नव्हता तर त्यांनी विधायक कार्यक्रमावरही भर दिला होता. भारतीय इतिहासातील १९२० ते १९४७ पर्यंतचा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखला जातो. या काळात महात्मा गांधी हे राष्ट्रीय ऐक्याचे प्रतिक बनून राहिले होते त्यांच्या शब्दासाठी हजारो देशभक्त आपल्या देशासाठी प्राणाची आहुती देण्यास तत्पर होते म्हणूनच स्वातंत्र्य आंदोलनातील हा कालखंड गांधीयुग या नावाने ओळखला जातो. सामाजिक, राजकीय व शैक्षणिक चळवळीचे नेतृत्व गांधींनी केले होते. सत्य, अहिंसा आणि प्रेम ही त्रीसुत्री त्यांनी अंगीकारलेली होती.

महात्मा गांधी हे श्रेष्ठ मानवतावादी होते. भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाला त्यांनी नेतृत्व दिले आणि त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्टय असे की त्यांनी सामान्य जनतेचा विश्वास संपादन करुन निःशस्त्र प्रतिकाराचा नवामंत्र दिला. त्यांच्या विधायक कार्यात खादी व ग्रामोदयाग यांचा प्रसार, स्वदेशी संकल्पना, जातीय ऐक्य ,स्त्री जागृत, प्रौढ शिक्षण इ. चा समावेश होतो. महात्मा गांधीजींच्या कार्याचा, चळवळींचा समाजमनावर फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो.पर्यायाने ' खेडयाकडे चला ' या मंत्राने अनेक साहित्यिकांचे लक्ष खेडयाकडे ग्रामीण जीवनाकडे गेले. त्यांनी ग्रामीण जीवन शब्दबध्द केले. ज्यांना समाजातील शोषण, दारिद्रय, परपीडा, भ्रष्टाचार, अनैतिकता, ढोंग, बदमाशी, गुंडप्रवृत्ती, माणसांचे संपलेपण, त्यांची तडफड, भोळेपण, शोषिकता जाणवली त्यांनी लेखनाच्या, साहित्याच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला. गांधी विचारांचा मराठी कादंबरीवर जास्त प्रभाव पडलेला जाणवतो. त्यामुळेच खऱ्या भारताचे म्हणजे पर्यायाने खेडयाचे खरे स्वरुप जाणून घेण्यास मोठी मदत होत असते.

सदानंद देशमुख यांची ' बारोमास ' ही शेतकऱ्यांच्या जीवनावरील वास्तववादी कादंबरी आहे. शेतीप्रधानता हे मुख्य वैशिष्टय असलेल्या भारतातील गरीब शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःखाचे चित्रण सदानंद देशमुख यांनी कादंबरीतून केले आहे. ' बारोमास ' या नावातच ही कादंबरी शेतकऱ्यांचे सततचे दुःख अभिव्यक्त करणारी असल्याचे जाणवते. बाराही महिने म्हणजेच संपूर्ण आयुष्यभर दुःखाचा डोंगर झेलणारा कष्टकरी वर्ग म्हणजे शेतकरी तिथी, वार, ऋतु, महिने, कामाचे स्वरुप वगैरे सर्वकाही बदलत असते परंतु दुःख मात्र त्यांचा पीछा सोडत नाही. ऐंशीनंतरचा बदलता ग्रामीण पट या कादंबरीत आलेला आहे " ग्रामीण वास्तव या कादंबरीत पहिल्यांदाच इतक्या धरदारपणे व्यक्त होते. त्यातील व्यक्ती, प्रसंग, वातावरणनिर्मिती, निसर्गाची रुपे आणि गावगाड्याची झालेली वाताहत याचे चित्रण आजपर्यंतच्या ग्रामीण कादंबरीत इतक्या प्रभावीपणे फार क्वचितच झाले असावे." असे प्रल्हाद वडेर यांनी कादंबरीचे परिक्षण करतांना आपले मत नोंदवलेले आहे.

एकनाथ हा ' बारोमास ' कादंबरीचा नायक. तो त्याच्या पिढीचे, समाजाचे प्रतिनिधित्व करतो. शांत, संयमी, संवेदनशील, कवी मनाचा, वाचन-लेखन करणारा, मनस्वी, दुसऱ्याला समजून घेणारा आणि समाजशील असा आहे. अतिशय प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण घेऊन एम . ए. बी. एड. शिकलेला असून अनेक ठिकाणी मुलाखती देऊन शेवटी त्याच्या वाट्याला निराशा आलेली असते. त्यामुळे तो म्हणतो, "पात्रतेनुसार सगळ्यांना समान पातळीवर कमाई करता येईल. राहणीमान सारखे ठेवता येईल अशी समाजव्यवस्था म्हणजे खरी समाजव्यवस्था" चांगल्यापैकी शिकुन देखील नोकरी मिळत नाही म्हणून शेतीमध्ये काम करण्यास कमीपणा वाटत नाही. म. गांधींनीही कोणत्याही प्रकारच्या कामाला कमी प्रतीचे समजले नाही . त्यांच्या मते काम किंवा श्रम हे कोणत्याही प्रकारच्या संपत्ती किंवा भांडवलापेक्षा कमी नाही. श्रम किंवा कामाची पूजा करावी असे ते म्हणत.असा हा शेतात राबणारा एकनाथ आपल्याला आपल्यापैकीच एक वाटतो आणि आहे त्या परिस्थितीत जीवन जगण्याचा प्रयत्न करतो.

Dongar Kathore

ISSN : 2348-7143
February 2021
**RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal**
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 238 : प्रसार माध्यमे आणि समाज*

SMB-1920

# वृत्तपत्र या प्रसारमाध्यमाचा इतिहास

प्रा. डॉ. शकुंतला एम. भारंबे
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर अॅप्लीकेशन
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता. यावल, जि. जळगांव.

जागतिक आणि भारतीय स्तरावरील वृत्तपत्रांचा इतिहास हा सुमारे २० वर्षाच्या आसपासचा आहे. मराठी वृत्तपत्रांचा विचार करीत असतांना दोन कालखंड पाडून करावा लागेल. पहिला कालखंड स्वातंत्र्यपूर्व व दुसरा कालखंड स्वातंत्र्योत्तर असा विभागला गेला आहे. पंधराव्या शतकात जर्मनमध्ये गटनबर्गने मुद्रणकलेचा शोध लावला आणि पहिला छापखाना सुरु केला. ही घटना माहिती क्षेत्रात क्रांतीकारक ठरली व माहिती क्रांतीचा पाया रचला गेला. ह्याच मुद्रणक्रांतीतून पुढे वृत्तपत्रांचा जन्म झाला.

भारतीय वृत्तपत्रांचा विचार करीत असतांना वृत्तपत्रांच्या जनकत्वाचा मान भारतीय चळवळीचे उद्गाते राजा राममोहन रॉय यांच्याकडे जातो. याचे कारण म्हणजे वृत्तपत्राच्या इतिहासात बंगालमधील घडामोडींना महत्वाचे स्थान आहे. एक तर ब्रिटीश आमदानीतील सर्वात महत्वाचा टापू त्यावेळी कलकत्ता येथेच होता. व्हाईसरॉयचा मुक्कामही बंगभूमीतच असायचा. त्यामुळे तिथे जे काही घडे त्याचे पडसाद देशभरात उमटत असत. अनेक ख्रिस्ती मिशनरी या भागात येऊन राहिले होते. त्यांची धार्मिक कार्येही सुरु झाली होती. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गोवा येथे आणि इकडे पूर्व किनाऱ्यावर बंगालमध्ये ब्रिटीश आमदानीच्या आश्रयाने मिशनऱ्यांचे कार्य चालू होते. सनातनी जीवनपध्दती कठोरपणे स्वीकारणारा आणि त्यानुसार रुढी-परंपरा अवलंबणारा भारतीय हिंदू समाज आणि नव्या जाणिवा, नवी दृष्टी घेऊन आलेले इंग्रजी राज्यकर्ते यांचा संघर्ष अपरिहार्य आणि अटळ होता. जुन्या रुढी-परंपरा यांनी कुंठीत केलेल्या समाजात बदल करण्याची आकांक्षा येथील काही देशी सुधारक व्यक्त करीत होते पण त्यांना मोठा विरोध होता. यावेळी त्यांना सहकार्य करण्यासाठी इंग्रजी राज्यकर्त्यांनी अनुकूल भूमिका घेतली आणि याच दरम्यान वृत्तपत्रांच्या जगाचेही महाव्दार खुले झाले.

वृत्तपत्रांच्या भारतीय भूमीतील इतिहासात 'हिकीज गॅझेट' ह्या वृत्तपत्राचा उल्लेख आरंभी केला जातो. ह्या इंग्रजी साप्ताहिकाचा पहिला अंक २९ जाने.१७८० साली प्रसिध्द झाला. हिकीच्या या अंकातून काही शिवराळ टीका आणि बदनामीकारक मजकुरामुळे त्याला तुरुंगवास घडला. त्यानंतर हे साप्ताहीक बंद पडले. तुरुंगवासाची शिक्षा मिळाल्यानंतर हिकीने समाजात मुद्रण स्वातंत्र्य असले पाहिजे अशीही टिप्पणी केली. ती लक्षणीय आहे असे रा. के. लेले यांनी मत नोंदविलेले आहे. याच दरम्यान बंगालमध्ये अनेक इंग्रजी वृत्तपत्रे सुरु झाली. भारतीय भूमीत सुरु झालेले 'हिकीज गॅझेट' हे पहिले वृत्तपत्र मात्र भारतीय वृत्तपत्रांनी केलेली कामगिरी, प्रबोधन आणि स्वातंत्र्याच्या चळवळीतील त्यांचे योगदान विचारात घेता भारतीय जाणिवेचे वृत्तपत्र सुरु करण्याचा मान राजा राममोहन रॉय यांच्याकडे जातो. 'पीटीआय स्टोरीचे' लेखक राघवन यांनी राजा राममोहन रॉय यांचा उल्लेख Father of India Press (भारतीय वृत्तपत्राचे जनक) या शब्दांत केला आहे. तर मराठी वृत्तपत्राचा पाया 'दर्पण' कार बाळशास्त्री जांभेकर यांनी घातला. ४ डिसेंबर १८२१ रोजी 'संवाद कौमुदी' हे बंगाली आणि 'मिरात-अल-अखबार' हे पार्शियन भाषेत अशी वृत्तपत्रे त्यांनी सुरु केली. भारतीय भाषांमधून प्रसिध्द होणारी वृत्तपत्रे आणि धर्माच्या आधारे सुरु असलेल्या दुष्ट रुढींना, पुराणपंथांना विरोध करणारे प्रबोधनपर असे विचार असा व्यापक दृष्टीकोन राजा राममोहन रॉय यांच्या एकूण भूमिकेत होता. सामाजिक प्रबोधनाचा विचार मांडणाऱ्या राजा राममोहन रॉय यांना बंगालच्या सनातनी वळणाच्या भूमीत हे फार मोठे काम करता आले. इंग्रजी शिक्षणाचाही त्यांनी पुरस्कार केला. कायद्यासमोर सगळे समान आणि न्यायदान व्यवस्थेचे स्वातंत्र्य या दोन गोष्टींचा त्यांनी पहिल्यांदा उच्चार केला. त्यांची हीच भूमिका पुढे स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेक नेत्यांनी उचलून धरली व पुढे नेली. नव्या जाणिवा, नव्या ज्ञानाची आस आणि लोक जागृतीचे साधन अशी भूमिका त्यांनी घेतली होती. १८३२ ते १९४७ हा स्वातंत्र्यपूर्व कालखंड राजकीय चळवळ आणि सामाजिक भूमिका यांचा संघर्ष असलेला कालखंड होता.

१८८२ साली 'मुंबईना समाचार' हे गुजराती भाषेतील साप्ताहिक मुंबईतून सुरु झाले. देवनागरी लिपीतले पहिले हिंदी वृत्तपत्र 'उदन्त मार्तंड' हे कलकत्याहून ३० मे १८२६ रोजी सुरु झाले. केरळ, तामिळनाडू, कर्नाटक या दक्षिण भारताच्या विविध भागात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या पुढाकारामुळे काही पत्रे निघाली पण ती मुख्यत: धार्मिक शिकवणूक देणारी होती. १८३१ साली ख्रिश्चन रिलीजस ट्रॅक्ट सोसायटीने 'तामिळ मॅगेझिन' मद्रासमधून सुरु केले. १८१२ साली ख्रिश्चन मिशनऱ्यांनी बेल्लारी येथे 'कन्नड समाचार' हे कन्नड भाषेतील पत्र सुरु केले. १८५० साली पंजाबात लाहोर येथे 'कोहिनूर' हे उर्दु भाषेतील साप्ताहिक सुरु झाले. देशातील महत्वाच्या भाषांमधील वृत्तपत्रांचे जग या दरम्यान म्हणजे १८२० ते १८५०च्या दरम्यान सुरु झाले. व्यापक अर्थाने लोकशिक्षण आणि प्रबोधन हेच मुख्य हेतू समोर ठेवून ही वाटचाल सुरु झाली. लोकशिक्षणापासून सुरु झालेली ही वाटचाल लोकांच्या हक्कांपर्यंत येऊन पोहोचली. १८३२ साली बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' या मराठी पत्राची सुरुवात केली. मराठीखेरीज बंगाली आणि इंग्रजी भाषा अवगत असणारे जांभेकर कोकणातून मुंबईत आले आणि वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी मराठी-इंग्रजी या दोन्ही भाषांमधून हे पत्र सुरु केले. आरंभी पाक्षिक असणारे दर्पणकारांनी आपल्या पहिल्या अंकात म्हटले होते, 'स्वदेशी लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृध्दी व येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्रतेने व उघडरितीने विचार करावयास हवा. या इच्छेने मुंबईत राणाऱ्या कित्येक



Dongar Kathora

SMB-19-20

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २७. समाजनिरीक्षक संत कवी - तुकडोजी महाराज

**प्रा. डॉ. शकुंतला मिठाराम भारंबे**
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, डोंगर कठोरे. ता. यावल, जि. जळगांव.

महाराष्ट्राला संतांची एक दीर्घ परंपरा लाभली आहे. संतांनी अध्यात्माचा मार्ग सांगत समाजसुधारणेचा – समाजप्रबोधनाचा मार्ग सांगितला. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, मुक्ताबाई, जनाबाई, सावतामाळी, चोखामेळा, तुकडोजी महाराज या सर्वांनी आपापल्या परीने समाजसुधारणेचे मार्ग दाखविले. समाजाला उदबोधित करण्याचा प्रयत्न केला. समाजाला परिवर्तनसन्मुख करण्याचा प्रयत्न केला. संत विशिष्ट काळात जन्माला येत असेल तरी त्यांचे विचार कालजयी असतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजही याला अपवाद नाहीत. राष्ट्राच्या व राष्ट्रातील जनमानसाच्या सुधारणेच्या अतीव तळमळीतून हे विचार प्रकट झाले आहेत.

विसाव्या शतकातील संत तुकडोजी महाराज यांचे साहित्य हे भारतीयांचे अमोल असे संस्कार-धन आहे. तसेच ते प्रेरणास्त्रोतही आहे. त्यांनी जीवनाच्या सर्वच अंगाचा विचार करून समाजप्रबोधनाची पताका उंच उंच फडकवित नेलेली आहे. राष्ट्रसंत तुकडोजींनी भजन, कीर्तन, प्रबोधन शिबीरे आणि ग्रामगीतेद्वारा जनप्रबोधनाचे कार्य हाती घेऊन जनसमुहाला वळण लावण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. ग्रामगीता ही विचारांना दिशा देणारी रसाळ अशी काव्यधारा आहे 'ग्रामगीता' विशुद्ध मानवतेचे स्वप्न पाहाते. माणसातील माणुसकी जागरणाचे काव्य आहे. मनुष्याला वळण लावणारी व चिरंतन मूल्यांच्या पूजनाला प्राधान्य देणारी महान रचना आहे. आपल्या अंतर्यानात विवेकवादी मूल्यांची पेरणी करणारी आहे.

संत तुकडोजींच्या अभंगगाठोतून भक्तीमार्गात आड येणाऱ्या षडरिपूंच्या उच्चाटनाचा उल्लेख केलेला आहे यातून होणारी मुक्ती केवळ व्यक्तिगत उन्नतीला कारक ठरत नाही तर यातूनच एका सात्विक समाजपुरूषाची घडण होते हे अन्य संतांप्रमाणे तुकडोजी जाण होते, पण हे त्यांनी सांगितले ते सर्व समाजालाही लागू होणारे आहे. जीवनात अपत्मोन्नती हा व्यक्तिगत भाग वाटत असला तरी सामाजिक सामंजस्यपूर्ण जीवनासाठीही या विकारांवर मात करण्याची गरज आहेच. तुकडोजींनी एका अभंगात म्हटले आहे.

तनु मने धने सदा करी सेवा ।
अंतरीच्या देवा दृढवोनी तुकड्यास म्हणे असोनी संसारी ।
जीवभाव दूर करूनी राहे ॥

तुकडोजींची ही भूमिका संतपरंपरेशी जुळणारी तर आहेच पण त्याचवेळी ती समाजसन्मुखही आहे. आपल्या अभंगातून त्यांनी सदभक्तीची लक्षणे सांगितली, भक्तीची आचारताचे मांडली. त्यांनी परोपकार हेच पुण्य, जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा, जीवदया आदी समाजधारणार्थ आवश्यक अशा गोष्टींना प्राधान्य दिले तुकडोजींची अभंगगाथा अप्रत्यक्षपणे भारतीय



Dongar Kathore

SMB-19-20

 ISSN - 2229-4929

# दलित साहित्यातील विषमतेचे चित्रण

प्रा. डॉ. शकुंतला एम. भारंबे
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन महिला महाविद्यालय,
डोंगर कठोरे, ता. यावल, जि. जळगांव

भारतीय स्वातंत्र्यानंतर प्रजासत्ताक लोकशाही राज्याची स्थापना झाली. सर्वांनाच मोफत व सक्तीचे शैक्षणिक धोरण ठरविण्यात येवून शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यात आला. बहुजन व दलित समाजातील तरुणांनाही शिक्षणाची संधी मिळाल्याने नव्या जाणिवा घेऊन समाजाच्या सर्व क्षेत्रात ती आत्मविश्वासाने मुक्तपणे वावरु लागले. भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य, बंधुता व न्यायाचे अर्थही त्यांना कळू लागल्याने त्यांच्या साहित्यातून हजारो वर्षांची धूसमट ऐकायला येऊ लागली. आजपर्यंत मध्यमवर्गापुरते जे साहित्य मर्यादित होते ते आता तळागाळातील पिडीत, बहुजन समाजापर्यंत पोहचू लागले. त्यामुळे त्या त्या प्रदेशातील खेडे व खेड्यातील जाती-जमातीतील प्रश्न साहित्यातून मांडले जावू लागले. आजपर्यंत कर्मठ परंपरेच्या नादाखाली जी बहुजन जनता जीवन जगत होती ती विषमताधिष्ठित समाजरचना साहित्याच्याद्वारा व्यक्त होवू लागली. डॉ. सुमनोहर असे म्हणतात की, ''सामाजिक प्रश्नांचं हे साहित्य आहे. हे साहित्य वास्तववादी आहे. माणसांवरील अन्यायाविरुध्द त्याचबरोबर प्रदेशाचं दैन्य दारिद्र्य हे वास्तव या साहित्यप्रवाहांतून व्यक्त झाले आहे.'' या साहित्याला सामाजिक बदलाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. बहुसंख्य जाती-जमातीच्या वाट्याला लाजिरवाणे, किळसवाणे जीवन का आले ? या प्रश्नांची उत्तरे आपल्याला येथील समाजरचनेत सापडतात. असा हा समाज सर्वच थरावर नागवला गेला. अज्ञानाच्या गर्तेत गटांगळ्या खाणारा, लाचार-दुबळा समाज शेकडो वर्षापासून पिळून निघत होता. माणसा-माणसात, जाती-जातीत, धर्मा-धर्मात दुरावा निर्माण झाला.

या दलित, बहुजन समाजाकडे उपेक्षित समाज म्हणून न बघता एक माणूस म्हणून पाहिले पाहिजे अशी अपेक्षा उत्तम बंडू तुपे यांची होती. त्यामुळेच त्यांनी आपल्या कथांमधून दलितांची भीषण वास्तवता रेखाटलेली आहे. त्यांचे साहित्य सामाजिक जाणिवेने ओथंबलेले आहे. या समाजाला येथील प्रस्थापित व्यवस्थेने आपल्या सोयीनुसार हजारो वर्ष धर्मव्यवस्थेच्या व जातीव्यवस्थेच्या नावाखाली बेमालूमपणे अज्ञानात व गुलामीत जखडून ठेवलेले आहे. 'जयवंत' ही कथा पाथरवट या भटक्या जमातीच्या जीवनावर आधारित आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून आज सुमारे ५० वर्षे होवून गेली तरीही या जमातीच्या साथी 'चोर जमात' हा शिक्का घेवून गावोगाव भटकंती करणारी ही जमात वाताहतीचे, अधांतरीचे जीवन जगत गावोगावी लागणारे जाते--वरवंटे, पाटे, देवाच्या मूर्ती, उखळ, खलबत्ते वगैरे दगडी वस्तू विकत असून आपला उदरनिर्वाह करत असते यासाठी सतत भटकंती करावी लागत असते. एखाद्या गावात त्यांना थांबायचे असेल तर गाव कारभाऱ्याची अथवा पाटलांची मर्जी सांभाळण्यांसाठी प्रसंगी कोंबडीचाही बंदोबस्त करावा लागतो. हे सगळे करुनही गावात कुठेही चोरी झाली तर याच जमातीला जबाबदार धरले जाते. पोट पाठीवर घेऊन आणि संसार गाढवावर लादून सतत भटकंती करणारा गोविंद आपले दुःख जयवंत जवळ बोलून दाखवितो, ''दिवस उगवायला तराळ येईल तवा परपंचा बांधून ठिवला पायजी. आक्षी सुगीच्या तोंडवर उठणकळा आलीय ... हे दिवस कधी सरयचं ? कितीबी दमानदारीनं वागलं तरी सरकारच्या नदरंत आमी गुन्हेगार ! काग घडलं की पयली हाजरी आमाला ... करा ईक्षास दियाचं ?''

गावकऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असणारी ही जमात गावात कुठेही चोरी झाली की पहिला आळ यांच्यावरच येतो. त्यामुळे पोलीसांचाही अत्यंत छळ सहन करावा लागतो. सन्मानाने त्यांना जगताच येत नाही. भटक्या जमातीचे एक अनोखे भावविश्व या कथेत लेखकाने चित्रित केले आहे.

'भस्म' ही कथा स्मशानात राहणाऱ्या मेलेल्या माणसांच्या हाडांची राख अंगाला फासून दारोदार भीक मागणाऱ्या शंकर मसणजोग्याची आणि त्याच्या कुटुंबाची कहाणी. समाजव्यवस्थेने निर्माण केलेली जातीपातीनुरूप व्यवसायाची आणि पोट भरण्यातील गुंतागुंत स्पष्ट करणारी ही कथा. मसणजोगी ही भटकी जमात. या जमातीने गावात राहू नये हा जणू दंडकच असल्याने ही जमात स्मशानातच राहत असते. ही मसणजोगी जादू-टोणा करतात असा लोकांचा समज असतो.

Dongar Kathora

RKK-19-20
'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 6, Issue 4 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

# हिमांशु जोशी के कहानियों में विविध आयाम

प्रा. डॉ. रविंद्र खरे
हिंदी विभागाध्यक्ष
कला, वाणिज्य एवं कम्प्युटर ॲप्लीकेशन
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरा,
ता. यावल, जि. जलगाँव (महाराष्ट्र)
Email-ravindrakhare78@gmail.com
Mo-9422462800

**प्रस्तावना :-**

हिमांशु जोशी हिंदी कथा-साहित्य में व्यक्ति एवं समाज को केंद्र में यथार्थवादी दृष्टिकोण व्यक्त करनेवाले कहानीकार के रूप चर्चित रहे है। समकालीन कहानीकारों की अधिकांश प्रतिनिधि रचनाओं में जो नयापन हैं, उसमें सामान्य मानवीय जीवन के बदलते संदर्भो को रेखांकित किया गया है। आज के कथाकारों ने शहरी जीवन के साथ-साथ ग्रामीण जीवन के विविध आयामों को अपनी कहानियों में स्थान दिया है और भाषा के इतने रूप निखरे है कि मात्र कहानी की दृष्टि में साहित्यिक उपलब्धियों को रेखांकित किया जा सकता है। उन्होंने कहानी का लेखन सन् १९५६ में आरंभ किया था। कथ्य के संदर्भ में लिखते हैं कि, ``अनावश्यक विस्तार लेखन को कोई गति नहीं देता। परिवेश का उतना ही चित्रण उचित है, जितना अत्यावश्यक हो। मूर्तिकार जिस तरह उतना ही हिस्सा रखता है, जितना मूर्ति के लिए आवश्यक समझता है, शेष तराशकर फेंक देता हैं, वही स्थिति किसी लेखक की भी होनी चाहिए।''[१] स्पष्ट रूप से कहा जा सकता है कि कहानीकार ने अपनी पत्रकारिता के जीवन में दिल्ली जैसे महानगरीयों के समाज का कोना-कोना छानकर समाज में फैली विषमता का दृश्य अपनी कहानियों में चित्रित किया है। समांतर कहानी के दौर में बहुत सी कहानियाँ आम आदमी को केंद्र में रखकर लिखी गई। समान्तर कहानी सीधे-सीधे आम आदमी के जीवन से अपने को जोड़ती है। हालाँकि हिमांशु जोशी का नाम भी समान्तर कहानीकारों में बराबर लिया गया। परंतु उस आंदोलन में आम आदमी के संघर्ष को अभिव्यक्ति मिली है। उनकी कहानियाँ आज भी मील का पत्थर साबित होती है। प्रस्तुत विषय के अंतर्गत कहानियों के कथ्य को निम्न मुद्दों में विभाजित किया जा सकता है - सामाजिकता, राजनीतिकता, आर्थिकता, धार्मिकता,आदि विविधआयामों से उनकी कहानियों का विश्लेषण किया जा सकता है।

**१) सामाजिकता:-**

सामाजिक कहानियाँ मानवीय जीवन के विभिन्न अंगों से जुड़ी होती है। विविध प्रकार से कहानीकार जीवन की भिन्न-भिन्न परिस्थितियों का रेखांकन करता है। सामाजिक कहानी का प्रमुख उद्देश्य सामाजिक यथार्थ की दृष्टि से मानवीय जीवन का चित्रण करना है। हिमांशु जोशी के सामाजिक परिवेश संबंधी कहानियों में विभिन्न समस्याओं को अभिव्यक्ति मिली है जिसका चित्रण उन्होंने निम्नलिखित रूप में किया है।

`अंततः तथा अन्य कहानियाँ' संग्रह की `एक पारमिता' उषा प्रियंवदा की कहानी `रीढ़ की हड्डी' की याद दिलाती है। विवेच्य कहानी द्वारा हिमांशु जोशी ने महानगरों में मध्यमवर्गीय परिवार में पढ़ी-लिखी लड़कियों का विवाह करना भी कितना मुश्किल हो रहा हैं, इसका बखूबी चित्रण किया है। विवाह-बंधन जैसे पवित्र प्रथाओं में भी आ गयी है। एक समय था जब माता-पिता की इच्छानुसार विवाह तय किये जाते थे। अब समय बदल गया है, जिसमें विवाह के लिए लड़की पसंद करना मज़ाक बन गया है। लड़की के अतीत एवं वर्तमान जीवन संबंधी इतने सवाल पूछे जाते है कि, लड़की मानो बाज़ार की कोई सजावटी वस्तु हो, जिसकी नुमाइश में उसे सभी प्रश्नों का उत्तर देना होता था। विवेच्य कहानी की पारो विवाह के पहले इसे देखने आए लड़कों को उत्तर देते-देते परेशान है, उसके साथ-साथ पूरे परिवार को

Dongar Kathora

RRK 19-20

ISSN : 2348-7143 Jan. 2020 RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 214 (C) :* हिंदी साहित्य में चित्रित हाशिए का समाज

# हिंदी भीम काव्य में व्यक्त दलित विमर्श

**प्रा. डॉ. रविंद्र आर. खरे**
हिंदी विभागाध्यक्ष, कला, वाणिज्य एवं कम्प्युटर अॅप्लीकेशन,
डोंगर-कठोरा, ता. यावल जि. जळगाव (महाराष्ट्र)

आधुनिक काल में सामाजिक धार्मिक और आर्थिक सुधार आंदोलनों की तरह मानवतावादी विचार धारा भी साहित्य के क्षेत्र में एक आंदोलन बन कर भी उभरने लगी है। इस प्रस्तावित विचारधारा के अनुसार मनुष्य को इस जगत् का सर्वाधिक महत्वपूर्ण प्राणी माना गया है। मनुष्य को सभी प्रकार के बंधनों से मुक्ति की कामना भी होने लगी। जिस प्रकार साहित्य को समाज का आईना कहा जाता है, परंतु स्वतंत्रतापूर्व के साहित्य में समग्र समाज के चित्रण का अभाव दिखाई देता है। सामान्य मनुष्य साहित्य के केंद्र में न के बराबर था। दलित, शोषित व पीड़ितों का जीवन साहित्य में कोसों दूर था। मानव की गुम हुई मानवता कभी साहित्य का विषय नहीं बन पाई थी । फिर ऐसे साहित्य को समाज का आइना कैसे कहा जा सकता है ? इतिहास इस बात का साक्षी है कि दलितों को सामाजिक, राजनीतिक अधिकार एक दीर्घ संघर्ष के बाद प्राप्त हुआ।

''लगभग पांच हजार साल से तथाकथित शुद्र और अस्पृश्य जातियां हिंदू समाज में व्याप्त जाति-व्यवस्था और अस्पृश्यता की घृणित कुप्रथा का शिकार थी। वे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षिक और राजनीतिक से वंचित थी। अब उनके विकास के अवरुद्ध पथ खुल चुके हैं। उन्हें सामाजिक और राजनीतिक अधिकार मिल गए थे । शिक्षा, आर्थिक और रोजगार से क्षेत्र में प्राथमिकता और संरक्षण भी प्राप्त हो गया था। सामाजिक न्याय और समता का संवैधानिक एवं शांति प्रिय मार्ग प्रशस्त हो गया था।''[१]

इस प्रकार दलित-शोषित एवं पीड़ित समाज अपना विभिन्न विद्रोह माध्यमों से व्यक्त करने लगा। विवेचित हिंदी भीम काव्यों में कवियों ने सामाजिक, धार्मिक, आर्थिक चिंतन पर प्रकाश डाला गया है।

**१. सामाजिकता :**

भारतीय समाज व्यवस्था ने मनुष्य के विभिन्न जाति, धर्म, पंथ तथा उपजाति में विभाजित कर मनुष्य को मनुष्य से दूर किया। स्पष्ट रूप से कहा जाए तो भारतीय व्यवस्था ने ही मनुष्य को गुलाम बनाया है। पीड़ितों, शोषितों को गुलामी से मुक्त होना हो तो इस व्यवस्था को ठूकराना पड़ेगा, तब कहीं वह गुलामी की बेड़ियाँ तोड़ पाएगा। डॉ. आंबेडकर का मानना है कि, शोषित और पीड़ितों की गुलामी से मुक्ति, उच्च शिक्षा, सरकारी नौकरियाँ और अच्छी आजीविका के साधनों से ही हो सकती है। डॉ. आंबेडकर ने पूरे विश्व में अपने विचारों द्वारा समस्त मानव जाति को इस दासता से मुक्त किया। अन्याय के प्रति लड़ने की शक्ति दी। डॉ. बाबासाहेब आंबेडकर के विचार हिंदी में भीम कवियों ने आत्मसात करके अपनी कलाकृतियों के माध्यम से अभिव्यक्त करते हैं।

भारतीय समाज व्यवस्था में डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने दलित एवं अछूत समाज को समता का मार्ग दिखाया। आछूतों को मनुष्य के रूप में जीने का अवसर प्रदान किया। इन विचारों को व्यक्त करते हुए-

*ऊँचा कौन कौन नीचा*
*प्रकृति ने सबको सींचा*
*अन्यायी अत्याचारी का सब तिरस्कार करो*
*जातिधर्म भाषायी भेदों का बहिष्कार करो*
*मानव होकर हर मन का साकार करो।*[२]

भारतीय समाज व्यवस्था में शोषितों को अपनी उन्नति करनी हो तो वे अपने आप में स्वाभिमान की भावना निर्माण करें। हमें तो अछूतों का उद्धार करना है तो सामाजिक ढाँचे में उनको पूरी स्वतंत्रता और समानता देनी होगी। वे अपनी प्रगति का मार्ग प्रशस्त कर सकेंगे। परिवर्तनवादी विचारधारा के डॉ. बाबासाहेब आंबेडकर वर्णविहीन एवं जातिविहीन समाज का निर्माण करना उनका लक्ष्य रहा है। इन विचारों पर अपना मत कविता में व्यक्त करते हुए लक्ष्मीनारायण सुधाकर लिखते हैं-

*वर्ग विहीन समाज का निर्माण करने के लिए*
*संघर्ष वह करता रहा इस देश में आंबेडकर*
*जाति-विहीन समाज का निर्माण करने के लिए*
*संघर्ष करता रहा इस देश में आंबेडकर।*[३]

भारतीय समाज व्यवस्था में जाति भेद और अस्पृश्यता के एक भारतीय सामाजिक धब्बा है । जो किसी भी देश में देश के सर्वांगीण विकास में बाधाएं उत्पन्न करते हैं। सदियों से चली आ रही वर्ण व्यवस्था ने मानव की प्रगति में रुकावट पैदा की है। इस मानव निर्मित वर्णव्यवस्था को तोड़ने में डॉ. बाबासाहेब आंबेडकर का योगदान सर्वश्रेष्ठ रहा है। जिससे सवर्ण वर्ग ने बहुजन समाज को सदियों से मानसिक गुलामी में जकड़ के रखा था। इस पक्ष में कवि रामदास निमेश अपनी कविता में व्यक्त करते हुए-

*समाज व्यवस्था का विश्लेषण । मानव से मानव का शोषण*
*मानव कृत है वर्ण व्यवस्था। नहीं ईश्वर कृत वर्ण व्यवस्था*
*शिक्षित वर्ग को श्रेष्ठ मानकर। दिया अशिक्षित नीच बनाकर*
*तीन वर्ग में बाँटा उनको। क्षत्रिय, वैश्य, शुद्र कर उनको।*[४]

**२. धार्मिकता :**

डॉ बाबासाहेब आंबेडकर एक धर्म चिकित्सक एवं धर्म पंडित रहे हैं। डॉ. आंबेडकर द्वारा बौध्द धम्म पुनर्जीवित हो गया है, उनका धर्म का प्रचार-प्रसार का कार्य उल्लेखनीय है। हिंदू धर्म व्यवस्था ने आछूतों के मानवीय अधिकार छीनकर उनको नारकिय जीवन जीने के लिए मजबूर किया था। जिस 'मनुस्मृति' के कारण मनुश्य को पशुवत्

RRK- 19-20

ISSN : 2348-7143
February 2020

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 232 : २१ वीं शताब्दी का हिंदी उपन्यास साहित्य

# 'गुनाह बेगुनाह' उपन्यास में अभिव्यक्त नारी संघर्ष

प्रा. डॉ. रविंद्र आर. खरे
हिंदी विभागाध्यक्ष
कला, वाणिज्य एवं कम्प्यूटर अॅप्लीकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरा, ता. यावल जि. जलगाँव.

२१वीं सदी के हिंदी उपन्यास साहित्य में सन २०११ में राजकमल प्रकाशन नई दिल्ली से प्रकाशित लेखिका मैत्रेयी पुष्पा का 'गुनाह बेगुनाह' उपन्यास हिंदी कथा साहित्य जगत में अपनी अमिट छाप डालता है। ग्रामांचल के जन-जीवन को केंद्र में रखकर मैत्रेयी पुष्पा ने बुंदेलखंड की देहाती नारी को महिला सबलीकरण के दौर में निर्णायक रूप में लाकर खड़ा किया। इस विषय से हटकर मैत्रेयी पुष्पा शिक्षित एवं घर की देहरी को लाँघती नारी की वेदना तथा यातनाओं को वाणी दी है। 'गुनाह बेगुनाह' उपन्यास पुलिस व्यवस्था की नारी सुरक्षा के प्रति खोखली मानसिकता, शाब्दिक, बलात्कार और अत्याचार का पर्दाफाश किया है। भारतीय समाज में समाज को नियंत्रित रखने के लिए या उस पर अंकुश लगाने के लिए एक शक्ति की आवश्यकता है। और वह है पुलिस। कोई भी भारतीय जब कानून कहता है, तब भी और जब सरकार कहता है तब भी, उसकी आँखों के सामने कुछ खाकी वर्दी की जरब दिखता है। इसके बावजूद थाने की दीवारों के पीछे क्या होता है, यह आम आदमी नहीं जानता। किंतु प्रस्तुत उपन्यास हमें इसी दीवार के उस तरफ ले जाता है, और उस रहस्यमय दुनिया के कुछ दहशतनाक दृश्य दिखाता है। वह भी एक स्त्री पुलिसकर्मी की दृष्टि से।

मैत्रेयी पुष्पा के उपन्यासों में परिवर्तित समय की बदलती हुई नारी का आख्यान है। जो नारी घर के चार दीवारों से निकलकर अपने सपने देखती है। पुरुष संस्कृति के कटघरे में उसके व्यक्तित्व को विकास से सीमित करते हैं। नारी देह की नोच-खसोट बचपन में घर के अंदर से शुरू होकर कामकाजी जीवन एवं अच्छे करियर के मार्ग विस्तृत है। यही अनुभव उपन्यास की मुख्य पात्र इला चौधरी को जन्म-जन्मांत तक मिलते रहे हैं। इला जो अपने नारी अस्मिता एवं अस्तित्व को अर्थ देने और समाज के लिए कुछ कर गुजरने का जुनून लेकर खाकी वर्दी पहनती है। जब वह इस व्यवस्था को अपनाती है, तब वहाँ देखती है कि धोखेबाजी, चालाक, कुटिल लेकिन डरपोक पुरुषों की दुनिया से निकल कर कुछ ऐसे पुरुषों की दुनिया में आ गई है जो और भी ज्यादा क्रूर, हिंसालोलुप, और स्त्रीभक्षक है। ऐसे मर्द जिनके पास खाकी वर्दी की शक्ति भी है, अपनी अपढ़ मर्दाना कुंठाओं का परिणाम देने की निरंकुश, निर्लज्जता भी और लोकतंत्र की अनुकूलता से भयभीत समाज की आँखों से दूर थाने की अँधेरी कोठरियों में मिलनेवाले रोज-रोज के मौके भी । यह उपन्यास हमें बताता है कि मानवता के विरोध में सबसे वीभत्स दृश्य कहीं दूर युद्धों के मोर्चों और परमाणु हमलों में नहीं यहीं हमारे घरों से कुछ ही दूर हमारे रक्षक ही भक्षक बन कर थानों में अंजाम दे रहे हैं। उन दृश्यों की साक्षी है, २१वीं सदी में पैदा हुई वह भारतीय नारी जिसमें अपने समाज के दयनीय पिछड़ेपन के बावजूद मानवता के उज्वल सपने देखने की दृष्टि रखी है ।

'गुनाह बेगुनाह' उपन्यास का नारी जीवन का संघर्ष विभिन्न आयामों में प्रस्तुत हुआ है, जिसे निम्न रूप में उद्घाटित किया जा सकता है ।

**नारी जीवन का सामाजिक संघर्ष**

मैत्रेय पुष्पा मूल रूप से हमारी सामाजिक संरचना पर ही सवाल उठाती है। बेटी पैदा होते ही बोझ के रूप में देखने वाला समाज अपने सिर पर से बोझ हल्का करना चाहता है । विवेच्य उपन्यास की इला चौधरी शिक्षित लड़की है, जिसने नारी अस्मिता को पुरुष समाज के सामने कभी झुकने नहीं दिया। वह अपनी पहचान बनाना चाहती है। अपने साथ-साथ तमाम नारी जाति की अस्मिता के लिए लड़ना चाहती है। उसने कुछ सपने सजोंए थे। जिन्हें पूरा करने में पुरुष अहं आड़े आ रहा था। जिसे इला, समीना ने तार-तार कर दिया । अपनी पहचान बनाने के लिए इला रातों-रात भाग जाती है। ''हरियाणा की औरतों का ज्ञान कोष पराधीनता का लोकतंत्र ऐसे ही माहौल में पैदा होकर बड़ी हुई है। औरत का जिंदगी का भेद पता ही चल गया। हाँ, नहीं तो अपनी दादी के साथ अपने भी मंडप की बात सुनकर घर से भाग जाती ? भागने के मूल में क्या था ? माँ जानती है, वह थी लड़की की लालसा । लालसा अच्छा पाने की नहीं, रेशमी कपड़ों की नहीं, गहने जेवर की नहीं, मौज मस्ती की नहीं, साधन सुविधा कि नहीं, प्रियतम पति की नहीं, संरक्षण और सुविधा कि नहीं, बस यह थी अपने बूते सम्मानपूर्वक जीने की लालसा। बस इतना कि अपने जीवन के प्रति खुद ही जिम्मेदार होकर जिंदगी का सफर तय करें।''[१]

स्पष्ट है कि नौकरी करने वाली नारी को सहकर्मियों की अवमानना सहनी पड़ती है । इला चौधरी को कॉन्स्टेबल की नौकरी करती है। कई बार सहकर्मी वरिष्ठों से भी लड़ना पड़ता है। वह जानती है कि पुरुष हर बार कोई न कोई साजिश कर नारी को जाल में फाँसने का षड़यंत्र करता है। जब इला कोई साहसी काम करती तो परिणाम बुरा होता। पर इला ने कभी साहस नहीं खोया, हालांकि उसका तबादला मेवात जैसे और मुजफ्फरनगर में किया गया। जहाँ जाने से लोग डरते हैं पर इला इस तबादले को कुछ कर दिखाने का अवसर मानती है।

विवेच्य उपन्यास के पात्र इला, चौधरी, प्रिया अग्रवाल और समिना की लड़ाई जितनी व्यक्तिगत उत्थान के लिए है उतनी ही सामाजिक उत्थान के लिए भी। उपन्यास के प्रारंभ में तो यह लड़कियाँ व्यक्तिगत करियर बनाने के लिए घर छोड़कर भाग आई है। पुलिस कॉन्स्टेबल होने के बावजूद यह तमाम महिलाओं पर होनेवाले अत्याचारों से दहल उठती है । सुरक्षा की माँग लेकर आयी नारियों की हालत कितनी भयावह थी, यह उन्होंने अपनी आँखों से देखा था।



Dongar Kathora

RRK-19-20

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# ५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नवयुवकों के लिए प्रेरणास्त्रोत

**प्रा. डॉ. रवीन्द्र आर. खरे**
हिंदी विभागाध्यक्ष, कला, वाणिज्य एवं कम्प्युटर ॲप्लीकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, ता. यावल, जि. जलगाँव.

**प्रस्तावना**

समाज की दिन-ब-दिन बिगड़ती दुर्दशा देख परिस्थितिनुरूप राष्ट्रसंत तुकडोजी महाराज का काव्य ईश्वर आराधना से ऊपर उठकर परिवर्तित होता गया। जिससे अपनेपन की संकुचित भावना हटाकर समाज, राष्ट्र तथा विश्वकल्याण की भावना उनके काव्य में स्पष्ट रूप से दिखाई देती है। मानवतावादी दृष्टि होने के कारण किसी भी धर्म को, व्यक्ति को, समुदाय-समाज को होनेवाली पीड़ा से तुकडोजी पीड़ित होते हैं। तत्कालीन सामाजिक परिस्थितियों का गहन अध्ययन कर उन्होंने निम्नलिखित तत्त्वों को अपने काव्य में अभिव्यक्त किया है। इस कारण आरंभ में शिक्षा प्रणाली, युवकों में आत्मनिर्भरता, बेरोजगारी की समस्या, युवकों के मन में राष्ट्रीय भावना आदि प्रगतिशील चिन्तन के आधुनातन आयामों को संक्षेप में स्पष्ट करना प्रस्तुत आलेख का मुख्य उद्देश्य है।

**1) शिक्षा प्रणाली**

भारत में शिक्षा प्रणाली को लेकर अनेक सुधार हुए फिर भी बेकारी, रिश्वतखोरी, भ्रष्टाचार जैसे अनेक कुप्रवृत्तियाँ क्यों पनपती है ? यह सवाल सदैव उभरकर आता है। शिक्षा तो मिल रही है, परंतु उसमें नैतिक बल नहीं रहा, राष्ट्रभक्ति नहीं रही, लोककल्याण की भावना नहीं रही है, जो राष्ट्र को उन्नति की ओर ले जाएँ। इसी कारण सभी संतों ने शिक्षा प्रणाली को सुधारने की अपेक्षा रखी है। राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भी इसकी आवश्यकता का प्रतिपादन करते हुए वर्तमान स्थिति की शिक्षा प्रणाली के संबंध में लिखते हैं -

``शिक्षण है भक्षण का सभी, रक्षण नही एक पल भी।
संस्कार जो नष्ट होंगें, है यही शिक्षण अभी।।
कारण है इसका धर्म से राजाहि तो निरपेक्ष है।
नेता पीछे गट-पक्ष है, सब वोट का ही लक्ष्य है।।''[1]

स्पष्ट है कि वर्तमान समय की शिक्षा प्रणाली केवल भक्षण करना सिखा रही हैं, जिसमें कोई संस्कार ही नहीं हैं, बल्कि मानवीय संस्कार नष्ट हो रहे है। जिसकी रक्षा करना मनुष्य भूल रहा है। नेताओं ने केवल वोटो की राजनीति शुरू की है। अपने स्वार्थ हेतु शिक्षा प्रणाली को 'जैसे थे' अवस्था में रखकर स्वार्थनीति की राजनीति खेली जा रही है। अत: नीतिविहीन शिक्षा के चरित्र का पालन हो रहा हैं -



Women's College Of Arts, Commerce & Computer Application, Dongar Kathora

Power of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue:III Oct. to Dec. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

# ओमप्रकाश वाल्मीकि की कविताओं में अभिव्यक्त आंबेडकरवादी चिंतन

**प्रा.डॉ.रविंद्र आर. खरे**
हिंदी विभागाध्यक्ष
कला, वाणिज्य एवं कॉम्प्युटर अप्लीकेशन,
महिला महाविद्यालय, डोंगरकठोर, ता.यावल जि.जळगांव (महाराष्ट्र)

हिंदी दलित कवियों और कथाकारों में ओमप्रकाश वाल्मीकि का स्थान प्रतिभा संपन्न साहित्यकार के रूप में हैं। वर्तमान हिंदी साहित्य में दलित साहित्य के रूप में विशेष पहचान रखनेवाले ओमप्रकाश वाल्मीकि ने उत्तरशती के हिंदी दलित साहित्य को समृद्ध करने में उल्लेखनीय योगदान किया हैं। हिंदी दलित कविता के इस प्रतिष्ठित कवि के कविता की खास विशेषता यह हैं,कि वाल्मीकि के मुख से जब कविता स्वयं प्रस्फुटित हो उठती हैं। उन्होंनें आपने भोगे हुए जीवन में जिन परिस्थितियों का सामना किया था, वे पीडाजण्य अनुभूति के उत्पीडन को, दलित शोषण को अभिव्यक्त किया और वर्णवादी व्यवस्था पर कडा प्रहार कर उसके प्रति आक्रोश, चीड और विद्रोह को आपने काव्य में व्यक्त किया हैं। हिंदी साहित्य में एक नयी परिवर्तनवादी चर्चा को निर्माण करनेवाले वाद-विवाद-संवाद में विश्वास रखनेवाले ओमप्रकाश वाल्मीकि ने आपनी साहित्यिक यात्रा 'कविता' से आरंभ की जिसके बाद यह सिलसिला कहानी,नाटक, आत्मकथा और अनुवाद तक जारी रहा हैं।

ओमप्रकाश वाल्मीकि का साहित्य-सर्जन कहानी संग्रह-;सलाम -सन 2000,घुसपैठिये-सन 2003,(छतरी , अम्मा एंड अदर स्टोरीज), आत्मकथा -(जूठन -सन 1997 दो भागो में ),(आलोचना - दलित साहित्य का सौंदर्य शास्त्र -सन 2001,मुख्यधारा और दलित साहित्य , दलित साहित्य :अनुभव ; संघर्ष एवं यथार्थ ),अनुसंधान परक ग्रंथ-सफाई देवता -सन 2008; नाटक -दो चेहरे , उसे वीर चक्र मिला था आदि में साहित्य सर्जन किया। मुख्य रूप से हम यहाँ ओमप्रकाश वाल्मीकि के कवि कर्म और कविताओं पर चिंतन करेंगे। उनका काव्य संग्रह -' सदियों का संताप'-सन -1989; 'बस्स! बहुत हो चुका -सन 1997 तथा ' अब और नहीं -सन 2009 इन तीन काव्य संग्रह की कविताओं के माध्यम से जीवन की सच्चाई, कटू भोगे हुए यथार्थ, जिसमें सामान्य मनुष्य की चेतना और उसकी विचार शक्ति पर चोट करके जागृत करने का प्रयास किया हैं।

हिंदी दलित कविता वर्तमान समय की पीडा प्रस्तुत कर दलित आन्दोलन को गति प्रदान करती हैं। दलित कविता तत्कालीन वर्णव्यवस्था की सामाजिक,संस्कृतिक, राजनीतिक तथा आर्थिक वर्चस्व के खिलाफ का प्रतिशोधात्मक संघर्ष को निर्माण करती हैं। ओमप्रकाश वाल्मीकि का मानना हैं कि, व्यवस्था का शिकार बनकर रहने से उसका विरोध करना होगा। यह अहसास केवल दलित कवि को ही हो सकता हैं। जिसे उसने स्वयं भोगा हैं। ओमप्रकाश वाल्मीकि के ' कहन' और ' लेखन ' के मूल में जहाँ एक ओर ' बुद्ध का दर्शन ' , ' ज्योतिबा फुले ' , ' सावित्रीबाई



Women's College Of Arts, Commerce & Computer Application, Dongar Kathora

SBD-2021
'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 252
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
August 2020

# जळगांव जिहयातील घटले स्त्री-पुरुष प्रमाण- रावेर तालुक्याचा क्षेत्रिय अभ्यास

डॉ. सुरेश भास्कर ढाके
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सहयोगी प्राध्यापक
कला,वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन
महिला महाविद्यालय,डोंगर कठोरे,
ता. यावल,जि.जळगांव (महा.)
मो.९४२०९३९५४४

**प्रस्तावना:-**

रावेर तालुका हा जळगांव जिल्हयातील विकसित तालुक्यापैकी एक तालुका म्हणून ओळखला जातो. रावेर तालुका हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा तालुका आहे. या तालुक्यात सिंचनाच्या सुविधा जास्त प्रमाणात आहेत. रावेर हे तालुक्याचे ठिकाण असून रावेर तालुक्याचे क्षेत्रफळ ६६९.०६ चौ. कि.मी. एवढे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ३,१२,०८२ असून नागरी लोकसंख्या ४७,६२३ आहे तर ग्रामीण भागातील लोकसंख्या २,६४,४५९ अशी होती. त्यापैकी १,६१,१४९ पुरुष व १,५०,९३३ स्त्रिया आहेत. एकुण लोकसंख्येमध्ये हिंदुंची लोकसंख्या २,२०,०१२ (७०.५०%), मुसलमानांची लोकसंख्या ६२,६३० (२०.०७%), बौध्द १६,७१४ (५.३६%), जैन ८३९(०.२७%), ख्रिश्चन २८२ ( ०.०९%) तर शिख ९० (०.०३%) अशी आहे. शेती हाच एकमेव व्यवसाय असल्यामुळे संशोधनासाठी निवड केलेल्या सर्व कुटुंबे हे शेतकरी किंवा शेतमजुर आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार रावेर तालुक्यात एकूण ११७ गावे आहेत. यापैकी २५ गावांची क्षेत्रिय संशोधनासाठी यादृच्छिक (Ramdom) नुमुना निवड पध्दतीने निवड केली. क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या २० गावांमधून प्रत्येकी ५ असे एकूण १०० कुटुंबांची निवड नमुना म्हणून केली. ही निवड करीत असतांना सुध्दा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर केला.

प्रस्तुत शोध निबंधातील बहुतांशी माहिती ही प्रश्नावलीच्या आधारे गोळा करण्यात आलेली असून अशा माहितीला व आकडेवारीला प्रश्नावलीचा आधार आहे. काही तक्त्यांमध्ये गटागटाने माहिती दिलेली आहे. या प्रत्येक गटाची कमाल मर्यादा त्या त्या गटात समाविष्ट केलेली आहे.

तक्ता क्रमांक १

निवड केलेल्या कुटुंबातील स्त्री-पुरुष प्रमाणाचा आकृतीबंध

| अ.क्र. | लिंग | संख्या | शेकडा प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | पुरुष | ३१५ | ५५.२६ | ८०३ |
| २ | स्त्री | २५५ | ४४.७४ | |
| | एकुण | ५७० | | |

(आधार - प्रश्नावलीवरून पूर्ण) ---२

(२)

वरील तक्ता क्र. १ मध्ये क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या कुटुंबातील स्त्री व पुरुषांची संख्या दिलेली आहे. या माहितीवरुन पुढील गोष्टी लक्षात येतात.

क्षेत्रिय संशोधनासाठी निवड केलेल्या कुटुंबातील एकूण सभासद संख्या ५७० असून त्यापैकी ३१५ (५५.२६ %) पुरूष, तर २५५ (४४.७४ %) स्त्रिया आहेत. म्हणजेच पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या १९ % कमी आहे.

SBD 20-21

Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019), Special Issue - 253 (B) Multidisciplinary Issue Peer Reviewed Journal | 2348-7143 October-2020

# कोविड-१९ चा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम- एक चिकित्सक अभ्यास

डॉ. सुरेश भास्कर ढाके
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सहयोगी प्राध्यापक
कला,वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन
महिला महाविद्यालय,डोंगर कठोरे,
ता. यावल,जि.जळगांव (महा.)
मो.९४२०९३९५४४
Email.sbdhake33@gmail.com

**प्रस्तावना -**

कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे संपूर्ण जगाचे अर्थशास्त्र कोलमडले आहे. हा आजार संसर्गजन्य असल्यामुळे अनेक देशांनी संचार बंदीचा अवलंब केल्यामुळे सर्वच क्षेत्रात उद्योग ठप्प झाले आहे. उद्योग व्यवसाय ठप्प झाल्यामुळे अनेकांपुढे कुटुंबाचा उदर निर्वाह चालविण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. देशातील अनेक कामगार गावी परतले आहेत.अशा परिस्थितीमुळे देशातील सर्वच लोकांना याचा आर्थिक फटका बसला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्रावर कोविड-१९ चा आर्थिक फटका बसल्यामुळे GDP चा दर मागील ४५ वर्षांपेक्षा खाली गेला आहे. बेरोजगारीच्या दराने मागील ६० वर्षातील पातळी गाठली आहे.उद्योग क्षेत्रातील GDP चा दर दिवसेंदिवस घटत आहे.म्हणून देशातील आर्थिक स्थिती डबघाईला आलेली आहे. सेवा क्षेत्रातील अनेक व्यक्तींच्या नोकऱ्या गेल्यामुळे सेवा क्षेत्राच्या विकासाला अंकुश लागला आहे. थोडक्यात कोविड-१९ मुळे भारत देश मागील ५० वर्ष मागे गेला आहे. देशातील लागू केलेल्या संचारबंदीमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले गेले आहे. उत्पन्नाचे मार्ग बंद झाल्यामुळे खेळत्या पैशाचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसून आला आहे. जिवनावश्यक वस्तू वगळता इतर वस्तूंच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झालेली आहे. महाराष्ट्र राज्याची आर्थिक स्थिती इतर राज्यांपेक्षा चांगली असली तरी राज्य आज या कोविड-१९ च्या परिस्थिती हतबल झालेले आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त फटका मध्यम, लघु व कृषी क्षेत्राशी निगडीत असणाऱ्या उद्योग धंद्यांना बसला आहे. मार्च महिन्यानंतर शेतकऱ्यांचा शेतमाल विक्री करण्याचा काळ असतो अशा परिस्थितीमध्ये लॉक डाऊन झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाची विक्री करण्यास अनेक समस्या निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. विविध राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका,सहकारी बँका,पतसंस्था आणि सावकार इ.कडून घेतलेल्या कर्जाची परत फेड करणे शक्य झाले नाही. शेतकरी वर्गाला सतत अनेक समस्यांचा सामना करावा लागतो यात तीळ मात्र शंका नाही.कारण २०१९-२० या खरीप व रब्बी हंगामात पाऊस चांगल्याप्रकारे असल्यामुळे पीके पण चांगली होती. शेवटी शेतमालाची विक्री करण्याच्या वेळेत जगात लॉक डाऊन झाल्यामुळे सर्वच व्यवहार ठप्प झाल्यामुळे खरेदी-विक्रीच्या अभावामुळे शेतमालाची विक्री न झाल्यामुळे शेतमालाची नासाडी झालेली आहे. यामध्ये कांदा, टरबूज, खरबूज, द्राक्ष, आंबा,पेरु,डाळिंब, केळी, कापूस,गहू, तांदूळ अशा महत्वाच्या व्यापारी पिकांचे मोठ्या प्रमाणात लाखोंचे नुकसान झालेले आहे. थोडक्यात कोविड-१९ च्या परिस्थिमुळे देशातील सर्वच राज्यातील कृषी, उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्रांचे अतोनात नुकसान झालेले आहे.यावरच या क्षेत्रांना पुर्नःजिवीत करण्यासाठी विविध सवलती देणे गरजेचे आहे.

SBD-20-21

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Oct. To Dec. 2020
Issue-36, Vol-20

0156

33

# जळगाव जिल्ह्यातील खादी व ग्रामोद्योग मंडळाचे कार्यात्मक मूल्यमापन

मार्गदर्शक
**डॉ. सुरेश भा. ढाके**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर अप्लिकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, जि.जळगाव

संशोधक
**अर्जुन तु. पाटील**
मु.पो.ता. बोदवड (कुंभारवाडया जवळ)
जि. जळगाव.

**********

**प्रस्तावना :**

मंडळाची स्थापना महाराष्ट्रात खादी व ग्रामोद्योगाना प्रोत्साहन देऊन त्यांचे संघटन विकास व विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० ( सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ नुसार ) करण्यांत आली आहे .

ग्रामीण भागातील गरजू लोकांना रोजगार पुरविणे, कारगिर उद्योजक बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य स्वयंरोजगारांच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृध्दी कारागिरांना कच्चा माल पुरवठा कारागिरांचे तांत्रिक कौशल्य वाढविणे यासाठी निवडक ग्रामोद्योगांचे प्रशिक्षण, खादी ग्रामोद्योगाच्या विकासास पोषक असे धोरण ठरविण्याबाबत शासनाशी प्रभावी संपर्क स्थापन करणे व स्थानिक साधन संपत्तीचा वापर करुन ग्रामीण भागातील उद्योजक सुशिक्षित बेरोजगार कारागिर यांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करुन देणे हा मंडळाचा उद्देश आहे.

भारतीय शेती हा राष्ट्र विकासाच्या पाठीचा कणा म्हणून संबोधला जातो. कारण उद्योगासाठी आवश्यक तो कच्चा माल शेतीमध्येच तयार होतो. खेडेगावातून तालुक्का व जिल्ह्याच्या ठिकाणी विक्री करुन लघु उद्योग व मोठे उद्योगापर्यंत पोहचविला जातो. त्याचप्रमाणे वनसंपत्ती व भूगर्भातील खनिज संपत्ती बाहेर काढून त्यापासूनही तर अनेक यंत्रे तंत्रे यांच्या माध्यमातून ग्रामीण उद्योग चालविले जात आहेत. सध्या वाढविण्यात आलेल्या १३४ ग्रामीण उद्योगामध्ये अनेक सेवा उद्योगाच्या समावेश झाल्याचे दिसते. अशा भरगच्च यादीतील ग्रामीण उद्योगांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यांमधील ग्रामीण कारागिरांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

ग्रामोद्योगातील कारागिरांना व्यवसायासाठी देण्यात आलेल्या कर्जाची परतफेड रोख रक्कमेशिवाय त्यांनी तयार केलेल्या वस्तुच्या स्वरुपात वित्तीय संस्था कर्जाच्या परतावयाच्या रक्कमे एवढी स्विकारतात. अशावेळी बहुधा तालुक्याच्या ठिकाणी बलुतेदार सहकारी संस्थामार्फत त्यांच्या भासदांना कर्ज वाटप केले असल्यास सभासदांकडून पूर्णपणे वसूली व्हावी म्हणून कारागिरांकडून वस्तुच्या स्वरुपात त्यांचा माल खरेदी केला जातो. असा तयार केलेला वा उत्पादीत वस्तुंना विकण्यासाठी बलुतेदार सहकारी संस्थाची दुकाने असतात. या दुकानांमार्फत कारागिरांकडून खरेदी केलेल्या वस्तुंवर अल्प नफा घेवून येणारी रक्कम संबंधीत कारागिरांच्या कर्ज खात्यात जमा केली जाते बरेचदा तर पावसाळ्याच्या दिवसात ग्रामोद्योग उत्पादीत वस्तुंना भरपूर मागणी नसल्याने किंवा बाजारपेठेतही वस्तुंना उठाव नसल्यामुळे कारागिरांना कच्चा माल खरेदी करण्यासाठी कर्जाची परतफेड करण्यासाठी जवळ पैसा नसतो. अशावेळी कारागीरांच्या बलुतेदार सहकारी संस्था महत्वाची भूमिका पार पाडतात आणि वस्तुच्या स्वरुपात कर्जाच्या रक्कमेचा परतावा करणे सोईचे होते. त्यामुळे वित्तीय संस्था व्यक्तीगत कर्जपुरवठा करण्यापेक्षा बलुतेदार सहकारी संस्थाच्या मध्यस्थीने कर्जपुरवठा करण्यातांना प्राधान्य देतात यामुळे वसूली कार्यवाहीसाठी त्यांना खर्च करावा लागत नाही . तसेच कर्जाची रक्कम ( मुद्दल ) बुडण्याची भिती राहत नाही.

**शोध निबंधाचे उद्दिष्टे :**

१) जळगाव जिल्ह्यातील खादी व ग्रामोद्योग मंडळाची रचना व कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
२) जळगाव जिल्ह्यातील खादी व ग्रामोद्योग मंडळाचे महत्त्व विशद करणे.
३) जळगाव जिल्ह्यातील खादी व ग्रामोद्योग मंडळाची भूमिका विशद करणे.

**गृहीतके :**



Women's College Of Arts Commerce & Computer Application Dongar Kathora

SBD-2021



८) मानवी जीवन आणि विज्ञानाचा अतिशय जवळचा संबंध असून, विज्ञान तंत्रज्ञानाचे महत्त्वही या कादंबरीतून विशद केले आहे.

संदर्भ :-

१) जयंत नारळीकर : 'प्रेषित (विज्ञान कादंबरी)', मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, ऑगस्ट १९८३

२) विलास खोले (संपादक) : 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, जुलै २००७.

३) शरद गायकवाड (संपादक) : 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, ऑक्टोबर २००९

४) शंकर विभुते : 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, जानेवारी २०१०.

५) शंकर विभुते : 'आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिकता', सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड, पहिली आवृत्ती, फेब्रुवारी २०१५.

६) संभाजी पाटील (संपादक) : 'एकविसावे शतक आणि मराठी साहित्य', अरुणा प्रकाशन, लातूर, पहिली आवृत्ती, एप्रिल २०१७.

□□□

**17**

# महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ : एक चिकित्सक अध्ययन

अर्जुन तु. पाटील
संशोधक,
जि. जळगाव

डॉ. सुरेश भा. ढाके
मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर अप्लिकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, जि.जळगाव

*********

**प्रस्तावना : Introduction**

ग्रामोद्योग ग्रामीण भागातील दुर्बल घटकांतील तसेच मागासवर्गीय लोकांना आणि ग्रामोद्योगातील कारागिराना खादी व ग्रामोद्योगाच्या कार्यक्रमान्दारे रोजगार उपलब्ध करुन देऊन दारीद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी राज्य शासनाने १९६२ मध्ये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना केली. खादी व ग्रामोद्योगांच्या कार्यक्षेत्रात अर्थात मार्च २०१० पर्यंत एकूण १३४ ग्रामोद्योगांचा समावेश करण्यात आला आहे.

**१. ग्रामोद्योगाची व्याख्या: Definition of Village Industry**

उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारसीप्रमाणे ''विस हजार (२०,०००) लोकासंख्यच्या आतील गावामध्ये प्रती कारागीरापोटी भांडवली कर्जाची रुपये ५०,०००/ — (पन्नास हजार) पर्यंत गुंतवणूक करण्यात येणारा उद्योग म्हणजे ग्रामोद्योग हाय. ''महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने आपल्या प्रकाशित पुस्तकात (''आपले हात आमची साथ'' — मंडळ प्रकाशन)'' ग्रामोद्योग म्हणजे गृहउद्योग, कुटीर उद्योग, पारंपारीक उद्योग. घरगुती उद्योग किंवा ग्रामोद्योग यामधील कारागिर हा घटक सामाईक असल्यामुळे वरिल सर्व उद्योगासाठी



Women's College Of Arts Commerce & Computer Application Dongar Kathora

SBD-20-21



37

# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील समस्या- एक चिकित्सक अभ्यास

डॉ. सुरेश भास्कर झांबे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला वाणिज्य व कॉम्प्युटर अॅप्लीकेशन
महिला महाविद्यालय डोंगरकठोरे, ता.यावल.जि.जळगांव

**********

**प्रस्तावना :-**

भारतातील इंग्रज राजवटीनंतर ही भारत देश कृषी अर्थव्यवस्था म्हणून गणला जात आहे.स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात केल्या गेलेल्या शोषणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.कुटिरउद्योग व लघु उद्योगाचा ऱ्हास ब्रिटीश कालखंडात झाला होता.भारतीय अर्थव्यवस्थेसमोर रोजगार निर्मिती ,दारिद्र निर्मुलन ,औद्योगिक विकास, कृषी क्षेत्राचा विकास , सेवा आणि पायाभूत सोयींचा विकास इ.समस्या निर्माण झाल्या होत्या.भारताने गेल्या साठ वर्षात नेत्रदिपक म्हणावी अशी प्रगती केली आहे.कारण देश स्वातंत्र झाला तेव्हा आपल्या भारताकडे स्वत:साठी पुरेल एवढे अन्नधान्य उपलब्ध नव्हते. १९६० नंतर डॉ.स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली हरित क्रांती घडून आली .आज भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला असून पुढील काही वर्ष शेतीतून कोणत्याच प्रकारे उत्पादन झाले नाही तरी अन्नधान्याची टंचाई निर्माण होणार नाही .भारताने अनेक समस्यावर मात करत देशाच्या आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे.पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विविध विकास कामे पूर्णत्वाकडे नेण्यात आले.औद्योगिक विकास ,पायाभूत सोयींचा विकास, सुरक्षा क्षेत्रातील विकास ,शिक्षण, बेरोजगारी,दारिद्रय , नैसर्गिक आपत्ती व आर्थिक विषमता अशा बाबतीत योजना राबविल्या आहेत.आतापर्यंत १२ पंचवार्षिक योजना राबविल्या आहेत.अलिकडच्या काळात मोदी सरकारने पंचवार्षिक योजनांऐवजी निती आयोगाची स्थापना केलेली आहे. भारताच्या मागील पाच वर्षांच्या GDP वृध्दी दरामध्ये चढ-उतार झालेला असल्याचे दिसून येते. जुले २०१५ मध्ये GDP वृध्दीदर ८.४ टक्के होता,तर जुले २०१६ मध्ये GDP वृध्दीदर ८.१ टक्के ,जुले २०१७ मध्ये GDP वृध्दीदर ५.६ टक्के आणि जुले २०१८ मध्ये GDP वृध्दीदर ८.२ टक्के होता. सध्य स्थितीत भारताला GDP वृध्दीदरामध्ये सातत्य राखण्यात अपयश आलेले आहे याचे प्रमुख कारण आहे भारतीय अर्थव्यवस्थेसमोर असणाऱ्या विविध समस्या होय. विकास ही सातत्याने व अविरत चालणारी एक प्रक्रिया आहे. एका राज्याचा विकास साध्य करणे म्हणजे सर्व राज्यांचा किंवा विभागांचा विकास नव्हे तर सर्व राज्यांचा किंवा विभागांचा विकास साधणे म्हणजे समतोल आर्थिक विकास साध्य करणे. आजमितीला भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आर्थिक विषमता, दारिद्रय, बेरोजगारी, लोकसंख्या वाढ, लिंग गुणोत्तर प्रमाण, शेतीची अल्प उत्पादकता, नैसर्गिक आपत्ती, बालरोजगार, असमान विकास औद्योगिक विकास , अशांतता, आंतरराष्ट्रीय व्यापारतोल, चलनवाढ, तुटीचा अर्थभरणा, प्रादेशिक अर्थसमतोल व आर्थिक शोषण इ. समस्या निर्माण झालेल्या आहेत.

आजपर्यंत राबविलेल्या विविध पंचवार्षिक योजना व विविध विकास योजनांतून देशातील भेडसावणाऱ्या सर्व आर्थिक समस्या सुटल्या नाहीत. जागतिकिकरणाच्या काळानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला चांगले दिवस आले असले तरी अंतर्गत आव्हाने किंवा समस्यांबाबत ठोस उपाययोजनांचा अभाव दिसून येत आहे. सध्य स्थितीला भारतात मोठ्या प्रमाणात बेरोजगारीची समस्या निर्माण झालेली आहे. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येमुळे वाढत्या दारिद्रयाचे प्रमाणही वाढतच आहे. दारिद्रयाच्या बाबतीत विविध योजना राबविल्या असल्या तरी या योजनांची अंमलबजावणी सर्व भारतात समान झालेली नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी भारतीयांचे आर्थिक शोषण केले होते ते आजही भारतीय व्यापारी, उद्योगपती, श्रीमंत व्यक्ती व राजकीय नेते करीत आहे. थोडक्यात आजमितीला भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक समस्या आहेत. त्या समस्यांचे उच्चाटन करणे भारतीय अर्थव्यवस्थेला शक्य आहे यासाठी प्रबळ इच्छाशक्ती हवी आहे व इच्छेला पैशांचे पाठबळ हवे आहे. आर्थिक व सामाजिक समस्या सोडविणे प्रत्येक देशाचे कर्तव्य आहे यासाठी भारत सरकारने विविध विकास कामे हाती घेतली पाहीजे. जेणेकरुन आर्थिक विकास साध्य करणे शक्य होईल.

**शोधनिबंधाचे महत्व:-**

भारतीय अर्थव्यवस्था जगातील प्रमुख देशांमध्ये चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून गणली जात आहे. वाढत्या उत्पन्नामुळे लोकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करणे प्रत्येक अर्थव्यवस्थेचे प्रमुख कार्य आहे. म्हणून दळणवळण, पायाभूत सुविधा , आरोग्य शिक्षण, स्वच्छता, किमान वेतन, जन्मदर अशा विविध क्षेत्रांकडे लक्ष देण्याची आवश्यकता

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# टाळेबंदी (लॉक डाऊन) नंतरची ग्रामीण अर्थव्यवस्था - एक विशेष अभ्यास

डॉ. सुरेश भास्कर ढाके
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला वाणिज्य व कॉम्पयुटर अॅप्लीकेशन महिला महाविद्यालय,
डोंगरकठोरे, ता.यावल.जि.जळगांव.
मो.नंबर-९४२०९३९५४४
Email-sbdhake33@gmail.com

**प्रस्तावना :-**

कोरोना महामारीचा प्रादुर्भाव शहरासह ग्रामीण भागातही दिवसेंदिवस वाढल्यामुळे ग्रामीण भागातील आठवडे बाजार सात महिन्यापासून बंद होते. टाळेबंदीमुळे (लॉक डाऊन) आठवडे बाजारातील होणारी मोठी उलाढाल यामुळे ठप्प झालेली होती मात्र कोरोनाच्या केलेल्या उपाययोजनांमुळे रुग्णांची संख्या हळूहळू कमी होऊन रुग्ण बरे होण्याच्या प्रमाणातील वाढीमुळे भारतासह सर्व राज्यांनी टाळेबंदीचे (लॉक डाऊन) सर्व नियम हळूहळू शिथिल केले. ग्रामीण भागातील लहान, मध्यम खास करुन आठवडे बाजार पुन्हा सुरळीत चालू होत आहे.कारण देशाच्या कान्याकोपऱ्यात कोठेही आठवडे बाजार शहरासह ग्रामीण भागातही मोठया प्रमाणात सुरु असतात या सर्व बाजाराची उलाढाल मोठया प्रमाणात होत असते. काही ठिकाणच्या आठवडे बाजारांना अनेक वर्षांची परंपराही आहे.उदा.दिल्लीतील मिना बाजार, गोरखपुरमधील मंडीचा बाजार अशा ग्रामीण भागातील आठवडे बाजारामध्ये फळे,भाजीपाला,शेती अवजारे,खेळणी,कपडे, किराणा,भांडी, भजी,भेळ,शालेय साहित्य, मिठाईची दुकाने ,चहाची दुकाने ,चप्पल व बुटची दुकाने ,वडापाव,मनोरंजन करणारे विविध कलाकार आदिंचा समावेश यात होतो.

ग्रामीण भागातील आठवडे बाजाराच्या आर्थिक उलाढालीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागातील ५३ टक्के लोक ग्रामीण बाजारातील वस्तूंची खरेदी करतात म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामीण आठवडे बाजारातील उलाढालीचा १७-२५ टक्के हिस्साआहे. इको इंडिया फायनान्सशियल सर्व्हिसच्या मते, भारतात घरगुती पैशांची देवाणघेवाण वार्षिक उलाढाल साधारणतः दोन लाख कोटी रुपयांच्या वर आहे. सुरुवातीला दरमहा पाच हजार कोटी रु. शहरातून ग्रामीण भागामध्ये पाठविण्यात येत होते मात्र टाळेबंदीमुळे (लॉक डाऊन) ८० टक्के घसरण झाली होती. पण सध्याची परिस्थिती पाहता यामध्ये बदल होऊन ती पूर्व पदावर येत आहे अशा पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने गरीबांसाठी कल्याणकारी योजना सुरु करुन त्या अंतर्गत जनधन योजनेतील महिलांच्या खात्यावर पुढील तीन महिने प्रत्येकी ५०० रु. दिले गेले आहे.[१]

देशामध्ये २५ मार्च पासून लागू झालेल्या टाळेबंदीमुळे (लॉक डाऊन) ग्रामीण अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झालेले आहे. देशातील ग्रामीण भागातील दैनंदिन कामावर जाणाऱ्या कामगारांवर उपासमारीची वेळ आली होती. शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. देशातील ८५ टक्के शेतकऱ्यांकडे २.५ हेक्टरपेक्षाही कमी जमीन आहे ते यावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. टाळेबंदीमुळे (लॉक डाऊन) सर्व व्यवहार ठप्प झाले होते. त्यामध्ये हातातोंडाशी आलेले रब्बी चे पिक काढण्यासाठी मजूर मिळणे कठिण झाले होते. तसेच काळी मिरी, कॉफी, टरबूज, खरबूज, मिरची व भेंडी या पिकांच्या लागवडीचा हा हंगाम होता. मात्र टाळेबंदीमुळे (लॉक डाऊन) या सर्व पिकांचा हंगाम वाया गेल्यामुळे शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. भाजीपाला आणि फुले या सारख्या नाशवंत पिकांचे उत्पादन तर तोटयात गेले आहे. कोरोनाच्या प्रभावामुळे

टाळेबंदीमुळे (लॉकडाऊन) परिस्थितीचा फायदा दलाल व अडते यांना झालेला असल्याचे दिसून आले आहे. उन्हाळी हंगाम हा लग्न समारंभासाठीचा हंगाम असतो. म्हणून या हंगामात फुलांसाठी मोठया प्रमाणात मागणी असते.

N2B-20-21

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 258 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
January 2021

# दीपनगर औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती

डॉ. विनोद झामा मोरे
सहाय्यक प्राध्यापक -अर्थशास्त्र विभाग
कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन महिला महाविद्यालय, डोंगरकठोरे,
ता. यावल, जि.जळगांव
मो.नंबर-७७०९४१८३८०
Email-vzmore39@gmail.com

**प्रस्तावना -**

आधारभूत संरचनात्मक सोयींना देशाच्या अर्थव्यवस्थेत फार महत्वाचे स्थान असते. कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर अर्थव्यवस्थेचा विकास प्रत्यक्षपणे अवलंबून असतो, मात्र त्या क्षेत्राचा विकास हा त्या देशातील सेवाक्षेत्र म्हणजे पाणीपुरवठा , ऊर्जा , वीजपुरवठा , वाहतूक व दळणवळण , व्यापार , विज्ञान व तंत्रज्ञान, शिक्षण व आरोग्य आदी सेवा किती विकसित आहेत , यावर अवलंबून असतो. नियोजनबध्द विकासाच्या प्रयत्नात पहिल्या योजनेपासूनच आधारभूत संरचनेचे विकासातील महत्व लक्षात घेऊन त्या सर्व सोयींचा जलदगतीने विकास करण्यावर भर देण्यात आला. जवळ-जवळ प्रत्येक योजनेत ५० टक्क्यापेक्षा जास्त खर्च आधारभूत संरचनेवर केलेला आहे. त्यामुळे संरचनात्मक सोयींमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे.

शेती व औद्योगिक विकासासाठी प्रामुख्याने ऊर्जा महत्वाची आहे. उपलब्ध स्त्रोतांत वीज ही अत्यंत महत्वाचा स्त्रोत आहे. कारण विजेशिवाय शेतीच्या उत्पादनात वेगाने वाढ होऊ शकत नाही. कारखानदारी क्षेत्राच्या विकासासाठी देखील वीज हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्याचबरोबर मानवाच्या राहणीमान व जीवनमानात वाढ करण्यासाठी वीज हा घटक महत्वाचा आहे. एकंदरीत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत विजेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

